# शहराची कारभारीण

नगरसेविका व राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण करू पाहणाऱ्या महिलांसाठी...

अंक - पहिला, क्रमांक - १, नोव्हेंबर २०१२ (खाजगी वितरणासाठी)



टाटा सामाजिक विज्ञान संस्था

महाराष्ट्र महिला परिषद

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**डॉ. जतीन मोदी**
अध्यक्ष, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**संपादक**

**रणजीत चव्हाण**
महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**संपादकीय मंडळ**

**डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर**
संचालिका, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**डॉ. अमिता भिडे**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**स्मिता वायंगणकर**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**भारती शर्मा**
महाराष्ट्र महिला परिषद

**नीला लिमये**
महाराष्ट्र महिला परिषद

**भीम रासकर**
महाराष्ट्र महिला परिषद

**सीमा काकडे**
प्रयास, पुणे

**संपादक / प्रकाशक**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था,
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
महाराष्ट्र महिला परिषद, मुंबई

**संपर्क**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
एम.एन.रॉय मानव संसाधन संकूल प्लॉट नं. ६,
एफ ब्लॉक, शासकीय वसाहती समोर,
इमारत क्र. ३२६, समोर, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. : ०२२-२६५७३७९५ / ९६
फॅक्स : २६५७ ३९७३

**टाटा सामाजिक विज्ञान संस्था**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज
व्ही. एन. पुरव मार्ग, देवनार,
मुंबई - ४०० ०८८.
दूरध्वनी क्र.: ०२२-२५५२५३७५ / ७६

**महाराष्ट्र महिला परिषद**
श्रमिक, रूम नं. ९३२/९३३/५५१
डी मार्ट च्या मागे, राजपाल हॉस्पिटलसमोर,
सेक्टर - ७, कोपरखैराणे, नवी मुंबई - ४००७०९
दूरध्वनी क्र.: ०२२-२७५४४२१९ / २७५४८२१२

**मुखपृष्ठ**
श्री. मुकुंद सावंत, टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**अंक जुळणी व मुद्रण**
एन.एस.डी. आर्ट, अंधेरी, मुंबई
दूरध्वनी क्र.: २८३९३४५० / ५१

***नोंद :*** **सदर अंकातीललेख हे लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक / संपादक मंडळ / प्रकाशक आणि संबंधित तीनही संस्था लेखात दिलेल्या मतांशी सहमत असतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.**

# संपादकीय

**‘उतू नको, मातू नको, लोकसेवेचा, राजसत्तेचा घेतला वसा टाकू नको.’**

प्रिय कारभारणींनो,

शहरे ही महाराष्ट्रातील उगवती सत्ता केंद्रे; या उगवत्या सत्ताकेंद्रातील तुम्ही उगवत्या कारभारणी.

नागरी सत्तेच्या अनेक नवीन समीकरणांची तुम्ही मांडणी करत आहात. हे करताना अनेक खाच-खळगे, अडचणींना सामोरे जात आहात, त्यातून मार्ग काढत आहात.

तुमचा मार्ग सोपा नाही. परंतु पालिकेतल्या, पक्षातल्या, सार्वजनिक आयुष्यातल्या व घरातल्या या विविध पदरी संघर्षातूनच तुमची जिगर आकार घेते आहे. तुमचे हे संघर्ष, अनुभव व तुम्ही घातलेल्या ‘पाया’वरच उद्याची कारभारीण मार्गक्रमण करणार आहे.

७३ व्या घटनादुरूस्तीनंतर पंचायतराजला नवे चैतन्य मिळाले. गावांगावांतील कारभारणींनी गावकुसाच्या राजकारणात आज सशक्तपणाने स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. या सत्तांतराच्या प्रक्रियेत ग्राम विकासाला मुलींचे शिक्षण, पाणी, स्वच्छता असे अनेक नवीन विषय मिळाले; कितीतरी चावडीत अडकलेल्या योजना लोकांपर्यंत पोचल्या. ७४ वी घटनादुरूस्ती, शहरांचा कारभार व येथील कारभारणींचा प्रवेश मात्र तुलनेने दुर्लक्षित राहिला आहे. असे का ?

शहरांतील कारभारणींची क्षमता ग्रामीण कारभारणींपेक्षा कमी निश्चित नाही. खरा अडथळा आहे तो शहरातील राजकारणाच्या प्रस्थापित व्यवस्थेचा. ही व्यवस्था खूप प्रबळ आहे. शिवाय शहरांचा कारभार गुंतागुंतीचा आहे. समजून घ्यायला थोडा क्लिष्ट आहे. त्यात महानगरपालिका शहरांची एकमेव कारभारी संस्था नाही. राज्य शासन, जीवन प्राधिकरण, इतर विकास प्राधिकरणे व इतर अनेक संस्थांच्या आंतर संबंधातून शहराचा कारभार आकार घेतो. परंतु एकदा यात घुसायचे ठरवले की अवघड ते काय ? तुमच्या कितीतरी बहिणी ही वाट यशस्वी रीतीने चालत आहेत, त्यावर आपला ठसा उमटवत आहेत.

महाराष्ट्र शासनाने सर्व स्थानिक संस्थांमध्ये - ग्रांमपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगरपंचायत, यात ५० टक्के जागा महिला लोकप्रतिनिधींसाठी राखीव ठेवल्या आहेत. ही एक मोठी संधी आहे. जे सत्तांतर अजून लोकसभेत व विधानसभेत झाले नाही, ते स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये होऊ पहात आहे. याचाच अर्थ असा की आपण एकटे नाही. पक्षांत व पक्षांबाहेर तुमच्या अनेक बहिणी आहेत व एकमेकांपासून शिकत, एकत्रपणे हा प्रवास करण्यास भरपूर वाव आहे.

आज महाराष्ट्रातील शहरांमध्ये अनेक प्रश्न आहेत. बेबंद, अनियोजित वाढ यातून पुढे येणारा घरे, पाणी, सांडपाणी व स्वच्छता व्यवस्था, या सर्वांचा अभाव हा सगळयात मोठा प्रश्न. या सोयीसुविधा देताना शहराचा कारभार समावेशक करणे, या सुविधांचा लाभ गरीब वस्त्यांपर्यंत पोचवणे हे दुसरे आव्हान. शहरांची वाढ पर्यावरण पूरक रीतीने करणे हे तिसरे.

या सर्व आव्हांनांना सामोरे जाण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम आहेत का ? हा कारभारी स्वतःच आर्थिक दृष्टीने कमकुवत आहे. शासकांची हे प्रश्न हाताळण्याची कुवत मर्यादित आहे. अनेक वर्षे या कारभाऱ्याचे हात-पाय बांधून ठेवले होते, तो साधनांसाठी सर्वस्वी दुसऱ्या संस्थांवर अवलंबून होता. त्यामुळे आपला कारभार हाकता हाकता, या प्रमुख कारभाऱ्याला कसे सशक्त बनवता येईलहा दृष्टीकोन हवाच.

कारभारणींनो, तुमचा महानगरपालिकां / नगरपरिषदा मधील प्रवेश हा मोठा आशादायी आहे. ज्या अथक प्रयत्नांमधून तुम्ही संसाराची घडी सांभाळता, तशाच प्रयत्नांमधून एक सशक्त, समावेशक शहरी कारभार आकार घेऊ शकतो. ती चाहूल आम्हाला दिसते आहे व म्हणून तुमच्या संघर्षांमध्ये साथ देण्यासाठी 'कारभारीण शहराची' पुढे येत आहे. या संवादपत्राद्वारे तुम्हाला महाराष्ट्राच्या शहरी कारभाराचा, त्यातील नवीन बदलांचा मागोवा घेता यावा, तुमच्या विविध स्तरांतील संघर्षाला संवादाचे बळ मिळावे, कारभारासाठी नवीन कल्पना सुचाव्या व तुमचा हा सत्ताप्रवास अधिक ठोस व्हावा हे कारभारणीचे प्रयोजन.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई, टाटा समाज विज्ञान संस्था-स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज व महाराष्ट्र महिला परिषद या तीन संस्थांच्या संयुक्त प्रयत्नाने आम्ही या पत्रकाद्वारे तुमच्याशी संवाद साधायचा प्रयोग करतो आहोत. प्रयोग अशासाठी की हे संवादपत्र चालू राहणे हे सर्वस्वी तुमच्या प्रतिसादावर अवलंबून आहे. पुढील वर्षभर हे द्वैमासिक तुमच्यापर्यंत पोचेल. तुमच्या प्रतिक्रियांची, सूचनांची, लिखाणाची व शुल्क नोंदणी द्वारा आर्थिक सहभागाची आम्हाला अपेक्षा आहे.

थोडे 'कारभारणी' च्या अंतरंगाविषयी. प्रत्येक अंक नगरपालिकांच्या कारभारासंबंधी एका पैलूची किंवा आव्हानाची ओळख करून देईल. या आव्हानाला / पैलूला पूरक अशी योजना किंवा शासकीय ठराव देखील प्रत्येक अंकात असेल. 'शहरनामा' एकेका शहराच्या कारभाराचा व तेथील बदलत्या सत्ता समीकरणांचा वेध घेईल. ७४ वी घटना दुरूस्ती व तिने दिलेले सक्षम स्थानिक कारभाराचे आश्वासन ही आपल्यासाठी मार्गदर्शक आहे. या घटना दुरूस्तीतील अपेक्षित बदल झाले का याचा वेध घेणे आवश्यक आहे, हे एका सदरातून निश्चित करू.

महानगरपालिकां / नगरपरिषदा यांच्या कारभारात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या, जागृतपणे संघर्षाला सामोरे जाणाऱ्या मैत्रिणींना सलाम देण्यासाठी 'सन्मानपत्र' प्रत्येक अंकात असेल, शिवाय एका मैत्रिणीचे अनुभव आणि सगळयात महत्वाचे- खुले पान हे 'खुले पान' आहे तुमच्यासाठी, तुम्हाला महत्वाच्या वाटणाऱ्या प्रश्नांच्या चर्चेसाठी, मत प्रदर्शनासाठी आणि प्रसंगी वादासाठी हे खुले पान तुमच्या लेखांची वाट बघत आहे. आपण महिला संवाद साधतो वाकप्रचारांतून, म्हणीतून, उखाण्यातून व गाण्यांतून. त्यामुळे या माध्यमांशिवाय कारभारीण अपूर्ण राहील. यातही तुमच्या सहभागाचे स्वागत आहे.

शेवटी कारभारणींना एकच आवाहन - उतू नको, मातू नको; लोकसेवेचा, राजसत्तेचा घेतला वसा टाकू नको.

**- डॉ. अमिता भिडे**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज
टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई

# अंतरंग


- **महानगरपालिका एक अवकाश** १
  महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थातील सहभाग - काही विचार
  *डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई*

- **विशेष लेख** ७
  'शहरी कारभारातील अवघड वाटा'
  *भारती शर्मा, महाराष्ट्र महिला परिषद*

- **संवाद कारभारणीशी** १०
  ॲड. वसुधा कऱ्हाड, नगरसेविका नाशिक यांची मुलाखत
  *मुलाखतकार - संजीव चांदोरकर, टाटा सामाजिक विज्ञान संस्था*

- **७४ व्या घटनादुरूस्तीचे प्रगतीपुस्तक** १२
  भाग १ : स्थानिक स्वराज्य संस्था, संरचना, अधिकार व कार्ये
  *स्मिता वायंगणकर, टाटा सामाजिक विज्ञान संस्था*

- **शहरनामा** १४
  सांगली - चांगली (?)
  *डॉ. अमिता भिडे, टाटा सामाजिक विज्ञान संस्था*

- **खुले पान** १५
  राजकारण आणि बॅनर
  *नीला लिमये, महाराष्ट्र महिला परिषद*

- **नागरी कारभाराचा अजेंडा - शासन निर्णय व योजनांची माहिती** १८
  महिला व बाल-कल्याण समितीने राबवायच्या योजना
  शब्दांकन : श्री. एफ.बी.खान, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य सस्था

# सन्मान कारभारणीचा

सन्मान पत्र देताना या मागची आमची भूमिका निश्चित आहे. सुदृढ व सुंदर समाज निर्मितीसाठी आज गरज आहे संवेदनशील सत्ताधारी व स्वच्छ राजकारणाची नाथ पै यांनी सत्ताधारी कसा असावा याचे समर्पक वर्णन केले आहे, 'जनतेच्या पायात काटा रूतला तर ज्यांच्या डोळ्यांतून अश्रू येतात, हे खरे सत्ताधारी होय.' असे सत्ताधारी होण्याची मनिषा आपण केलेल्या कार्यातून परावर्तीत होताना दिसते तसेच हीच भूमिका जनमानसात पक्की व्हावी म्हणून आम्ही आपणाला हे सन्मान पत्र देत आहोत.

**संकल्पना - रचना**
भीम रासकर, महिला राजसत्ता आंदोलन



**॥ कारभारणींचा नवा दागिना, ताठ मान-ताठ कणा ॥**



आज आम्ही **मा.'श्रीमती चंद्रकांता लक्ष्मण सोनकांबळे** राहणार पिंपरी चिंचवड यांना नगरसेविका म्हणून हे मानपत्र सन्मानाने देत आहोत.

लोकप्रतिनिधी या नात्याने आपण लोकहिताचे राजकारण मनापासून करीत आहात. महिलांसह गरीबाला सन्मानाने जगता यावं हे ध्येय तुम्ही समोर ठेवले आहे. विरोधकासंह सर्व मतदारांशी तुम्ही जिव्हाळयाचा व्यवहार ठेवण्याचा मनापासून प्रयत्न करीत आहात.

धर्म, जात, लिंग, भाषा, वर्ग हे भेद मतदारांसाठी काम करत असताना आड येत नाहीत. समतेचे उद्दिष्ट ठेवून तुम्ही सामाजिक कार्य करित आहात. इतकेचं नव्हे तर मतदार संघाला योग्य न्याय मिळावा, म्हणून तुम्ही स्वतःच्या कारभार क्षमता वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहात.

छोटे-मोठे यश व अपयश पचवत तुम्ही विकासाचा नवा पत्ता - अर्ध्या महिला अर्धी सत्ता ही घोषणा आपण सार्थ ठरवाल अशी अपेक्षा आहे. स्थानिक लोकशाहीवर तुमचा विश्वास असून ती बळकट करण्यासाठी तुमचे प्रयत्न सुरू राहतील असा विश्वास वाटतो.

तुमच्या या निःस्वार्थी योगदाना करिता हे मानपत्र देताना आम्हाला आनंद होत आहे.

तुमच्या या कष्टपूर्वक व सातत्याने टिकून राहण्याच्या या प्रयासाला आमचा निरंतर पाठिंबा व शुभेच्छा !

दिनांक : नोव्हेंबर २०१२

स्थळ : मुंबई

**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था**

**टाटा समाजिक विज्ञान संस्था**

**महाराष्ट्र महिला परिषद**

## महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थांतील सहभाग - काही विचार

स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाही राज्यव्यवस्थेचे परिणामकारक अवयव बनवण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता ७४ वी घटना दुरूस्ती करण्यात आली. ७४ वी घटना दुरूस्तीचा (१९९२) महत्वाचा उद्देश हा होता की नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अधिक मजबूत व कार्यक्षम व्हाव्यात आणि विकासाच्या दृष्टीने त्यांचे काम उपयुक्त ठरावे.

या घटनेला १२ व्या परिशिष्टाची जोड देऊन स्थानिक स्वराज्य संस्थांनी पार पाडावयाच्या कामांची व्याप्तीही वाढविण्यात आली.

७४व्या घटना दुरूस्तीमुळे, महानगरपालिका / नगरपरिषदांच्या कामाच्या कक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. घटना दुरूस्तीच्या १२ व्या परिशिष्टातील कामे परिणामकारकरित्या पार पाडण्यासाठी नगरप्रशासनाच्या सर्व प्रक्रियेत भाग घेण्यासाठी लोकप्रतिनिधीने अधिक तत्परता दाखविली पाहिजे.

१९९२ साली, विशेषतः ७४ व्या घटना दुरूस्तीबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांकरिता एक तृतीयांश जागा राखीव ठेवून महानगरपालिका व नगरपरिषदां क्षेत्रात सहयोगाचा कायदेशीर व भौतिक पाया घातला गेला. महिलांचा सामाजिक व राजकीय सहभाग वाढविण्याच्या हेतूनेच राखीव जागांचे प्रमाण वाढविण्यात आले आणि त्यामुळेच महिलांना सामाजिक व राजकीय क्षेत्रात स्थानिक पातळीवर काम करण्याची मोठ्या प्रमाणावर संधी प्राप्त झाली. आता राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत पोचले आहे. राखीव जागा धोरणांबरोबर महानगरपालिका व नगरपरिषदांचा चेहरामोहराच बदलला. येथे मोठ्या संख्येने महिला लोकप्रतिनिधी दिसू लागल्या.

या दृष्टीने काही बाबींचा विचार होणे महत्वाचे आहे.

- **महानगरपालिका / नगरपरिषदांत कोणत्या स्तरातील महिला आलेल्या दिसत आहेत ?**

  सर्व पक्षीय महिला नगरसेविकांशी बोलतांना एक गोष्ट स्पष्ट झाली की स्त्रियांसाठी राखीव जागांमुळेच महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधीत्व मिळाले. बहुतेकांचे म्हणणे असे की, कोणत्याही राजकीय पक्षांनी इतक्या मोठ्या प्रमाणावर महिलांना शहर पातळीवर प्रतिनिधीत्व कधीच दिले नसते.

- **कोणत्या स्तरातून या महिलांनी स्थानिक राजकारणात प्रवेश केला ?**

  कोणत्याही महानगरपालिका वा नगरपरिषदेत गेल्यास असे दिसून येते की, स्थानिक राजकारणात सक्रीय असणाऱ्या कुटुंबातील स्त्रियांना स्थानिक राजकारणात सहज प्रवेश मिळाला आहे. पुष्कळवेळा प्रतिनिधीत्व करणाऱ्या नगरसेविका ह्या राखीव विभागामुळे पती, वडील वा अन्य पुरूष नातेवाईकांच्या बदली निवडणूक लढविताना दिसून येतात. एकंदरीत आपल्याच घरात 'सीट' राखण्याचा कल दिसून येतो.

- डॉक्टर, वकील, इंजिनिअर, शिक्षिका, व्यापारसंघ वा कामगार संघटना यात कार्यरत महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधी झालेल्या दिसतात.

- सामाजिक वा स्वयंसेवी संस्थात कार्यरत असणाऱ्या महिला.

- काही विशिष्ट राखीव जागा.

  १९९२ साली प्रथमच मोठ्या संख्येने महानगरपालिका व नगरपरिषदा क्षेत्रात दाखल झालेल्या थोड्याश्या साशंक, व असुरक्षित वाटणाऱ्या नगरसेविका आज २० वर्षाच्या कालावधीनंतर मात्र बऱ्याच धीट व आक्रमक झालेल्या दिसत आहेत. व्यावसायिक पाठबळ असणाऱ्या महिलांबरोबरच अश्याही काही महिला आहेत की ज्यांनी शालेय शिक्षणही पूर्ण केलेले नाही, तर काही 'चूल-मूल-घर' या चक्रातून प्रथमच बाहेर पडलेल्या आहेत.

- **महानगरपालिका / नगरपरिषदा राजकारणात प्रवेश केल्यावर काही विशिष्ट समस्यांना सामना करावा लागला का ?**

  विविध स्तरातून आलेल्या महिला नगरसेविकांशी बोलताना असे जाणवते की, काही विशिष्ट समस्या सर्व पक्षातील महिलांना नक्कीच भेडसावित होत्या. राजकीय वातावरणाविषयी समज वा गैरसमज, वैयक्तिक असुरक्षितता, राजकारणातील गुन्हेगारीकरण, आत्मविश्वासाचा अभाव, सार्वजनिक संभाषणाची कमतरता, साधन सामुग्री व आर्थिक पाठबळाची कमतरता, राजकीय पाठबळाची कमतरता, महागनरपालिका / नगरपरिषदा कायद्यांबाबत अज्ञान, नागरी प्रश्न व नागरी सेवा सुविधा वितरण्याबाबत पूर्व अनुभवाचा अभाव, अपुरे शिक्षण वा प्रशिक्षण, सामाजिक व आर्थिक प्रश्न आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या असे अनेक प्रश्न ह्या महिलांना नक्कीच भेडसावित होते. परंतु बऱ्याच महिला नगरसेविकांनी यातून मार्ग काढलेला दिसतो.

  अजूनही ह्या सर्व अडचणी पूर्णपणे सुटल्या असे म्हणता येणार नाही. मात्र महानगरपालिका वा नगरपरिषदांमधील काही महिला

नगरसेविकांची वाटचाल नक्कीच धीटपणे होत आहे, अगदी सर्व बाबीत.

एवढ्या प्रचंड संख्येतील महिलांकडे आजच्या स्थानिक राजकारणाचा चेहरामोहरा पूर्ण बदलून टाकण्याची ताकद नक्कीच आहे. अर्थात महिला लोकप्रतिनिधींना आपली भूमिका उत्तम रितीने निभावण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांना अधिक सक्षम करणे आवश्यक आहे की जेणेकरून त्यांच सामर्थ्यशीलतेच्या प्रक्रियेवर त्याचा सकारात्मक प्रभाव पडू शकेल.

या पार्श्वभूमीवर मोठ्या व छोट्या शहरांच्या नागरी समस्या आणि त्यांचे योग्य निराकरण ही गोष्ट अत्यंत गुंतागुंतीची झाली आहे. त्याचबरोबर लोकनियुक्त स्थानिक कारभाराचे क्षेत्रही वाढले आहे. लोकप्रतिनिधी कोणत्याही राजकीय पक्षाचे वा अपक्ष असले तरी सर्व साधारण जनतेच्या लोकप्रतिनिधींकडून काही विशिष्ट अपेक्षा असतात. आज नागरिक याबाबत अधिक आग्रही होत आहेत. जनतेच्या अपेक्षा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी लोकप्रतिनिधींना अधिक प्रयत्न करावे लागतील.

प्रत्येक शहरात प्रत्येक विभागाच्या समस्या वेगवेगळया स्वरूपाच्या असून निरनिराळया वस्तुस्थितीशी निगडित असतात. परंतु कचऱ्याची वेळेवर विल्हेवाट, रस्ते व पदपथांची नियमित डागडुजी, रोजच्या रोज परिसर स्वच्छता, तुंबलेली गटारे, डासांचा उपद्रव आणि नियमित प्रतिबंधक उपाय, अंधाऱ्या रस्त्यावरील दिव्यांची वेळेवर दुरूस्ती, उद्याने वा क्रीडांगणांची निर्मिती व देखभाल, अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न, अतिक्रमणे, वगैरे काम अग्रक्रमाने करावी लागतील. अशावेळी प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांबरोबर नियमित व विस्तृत चर्चेच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींचे काम सोपे व योग्य दिशेने होऊ शकेल.

प्रत्येक शहरातील नागरी सेवा-सुविधा वितरणाकडे पाहता, नागरिकांच्या समस्या सोडविण्याबाबत वेगवेगळया समित्यांमधून कामे मंजूर करून घेणे वा संबंधित खात्यांमधून ती वेळेवर करून घेणे ही सर्वच लोकप्रतिनिधींची खरी जबाबदारी आहे. त्या दृष्टीने लोकप्रतिनिधी व प्रशासन संबंधाचे महत्व विशेष आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या स्थानिक स्वराज्य संस्थेतील दोन घटकांचे परस्पर संबंध चांगले असतील तरच ते दोघे मिळून नागरिकांना नागरी सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याची कामे जास्त प्रभावीपणाने करू शकतील. जेथे हे संबंध बिघडलेले असतात त्या शहरातील नागरी सेवा-सुविधा वितरणावरही नक्कीच परिणाम होताना दिसतो.

**नागरी व्यवस्थापनात प्रशासनाची तीन तत्वे आहेत.**

- शहराच्या समस्या आणि त्या आधारित महानगरपालिका / नगरपरिषदा यांची धोरणे ठरविणे व त्यांची अंमलबजावणी या दोन गोष्टीत निश्चित फरक आहे.
- प्रत्येक शहरातील नागरी समस्या व नागरी सेवा-सुविधा वितरण पाहता धोरण आखणी व त्यानुसार कार्यक्रम / धोरणे ठरविण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधी, महानगरपालिका / नगरपरिषदेची आणि विविध समित्यांची आणि त्यानुसार अंमलबजावणी ही जबाबदारी प्रशासनाची असते.
- प्रशासकीय कार्यान्विततेत विशेषतः दैनंदिन कारभारात लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप ही गोष्ट कोणत्याही नगर व्यवस्थापनात अभिप्रेत नाही.

थोडक्यात लोकशाहीची तत्वे व परिणामकारक नागरी सेवा-सुविधांचे वितरण व्यवस्था यांचा समन्वय हा स्थानिक स्वराज्य संस्थाच्या संरचनेत करण्यात आला आहे. महानगरपालिका / नगरपरिषदा यांची निर्मिती व रचना एक अधिनियमाने झालेली असते. लोकप्रतिनिधींचे अधिकार, कर्तव्ये, नगरपरिषदा / महानगरपालिका व कार्यकारिणी समित्या यांची कर्तव्ये व कार्यकक्षा, अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यकक्षा, महानगरपलिका / नगरपरिषदा यांची मालमत्ता, निधी व दायित्वे, अर्थसंकल्प, करआकारणी, इत्यादी बाबी संबंधित अधिनियमात तपशीलवार दिलेल्या आहेत आणि त्यांचे पालन योग्य रितीने झाल्यास नगरपरिषदा / महानगरपालिका यांची प्रतिमा अधिक सुधारण्याचा एक मार्ग आहे.

**लोकप्रतिनिधी भूमिका आणि नागरी व्यवस्थापन**

लोकप्रतिनिधींच्या अधिकारांचा व जबाबदाऱ्यांचा संयुक्त विचार व्हायला हवा. महानगरपालिका / नगरपरिषदा सभागृहाचे सदस्य तसेच विविध समित्यांचे सदस्य म्हणून लोकप्रतिनिधींना काही विशिष्ट अधिकार आहे, परंतु ते धोरण ठरविण्याचे आहेत, कार्यकारी स्वरूपाचे नाहीत. प्रशासनाच्या विशेषतः अंमलबजावणी वा कर्मचाऱ्यांच्या बाबी लोकप्रतिनिधींच्या अधिकार कक्षेत येत नाहीत. प्रत्येक शहरात वा महानगरपालिका / नगरपरिषदेची धोरणे ठरविणे. त्यासंबंधी नागरी हिताची कामे ठरविणे आणि प्रत्यक्ष त्या कामांची अंमलबजावणी कुठे सुरू होते याचीही जाणीव ठेवली गेली पाहिजे. अन्यथा प्रशासन व लोकप्रतिनिधी यामध्ये संघर्ष निर्माण व्हावयाची शक्यता असते.

कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर व कर्तव्यनिष्ठेवर प्रत्येक महानगरपालिका वा नगरपरिषदेची प्रतिमा अवलंबून असते. परंतु प्रशासन अंमलबजावणी ही ठरविलेल्या धोरणांच्या वा कार्यक्रमानुसार करत नसेल तर लोकप्रतिनिधी हे महानगरपालिका / नगरपरिषदा यांच्या सभेत व वेगवेगळया समित्यात प्रशासनास प्रश्न विचारून धारेवर धरू शकतात की जेणेकरून धोरण अंमलबजावणीतील त्रुटी दूर होतील. महानगरपालिका / नगरपरिषदा व समित्यांचे अधिकार हे संयुक्तरीतीने लोकप्रतिनिधींचे असतात. महानगरपालिका / नगपरिषदा, विविध समित्या, त्यांची कार्यकक्षा व अधिकार आणि प्रशासनाचे अधिकार हे विशिष्ट कायद्याने ठरलेले असतात. प्रशासन आपल्या कामात कमी पडत असेल तर जागरूक लोकप्रतिनिधी प्रसासनास चूक वा त्रुटी दाखवू शकतात.

महानगरपालिका / नगरपरिषदा यांचे वा समित्यांचे सभासद या नात्याने लोकप्रतिनिधींचे अधिकार मोठे आहेत. एकंदर शहराचा वा गावाचा विकास, नागरी सुविधांचे वितरण, शहरातील एकंदरीत जीवनमान ह्या गोष्टी लोकप्रतिनिधींवर अवलंबून असतात आणि यासाठी लोकप्रतिनिधी जागरूक, अभ्यासू असणे आवश्यक आहे. प्रशासनाकडून चांगले काम करून घ्यावयाचे असेल तर लोकप्रतिनिधींनी धोरणे व कार्यक्रम त्यानुसार ठरविली पाहिजेत. यासाठी आपापल्या विभागातील नागरिकांशी सतत संपर्क ठेवून त्यांच्या समस्यांचे विश्लेषण व त्या सुविधा लोकांना नीट मिळतात की नाही हे पाहणे महत्वाचे आहे. नागरिकांच्या समस्यांचा सतत पाठपुरावा करण्यासाठी तसेच स्थानिक प्रशासनाला केलेल्या सूचना वा प्रस्तावांची कार्यान्वितता कशी आहे यासाठी लोकप्रतिनिधींनी परिषदेत नियमित जाणे आवश्यक आहे की जेणेकरून प्रशासनाकडून लवकरात लवकर कामे होतील.

तसेच महानगरपालिका वा नगरपरिषदा तसेच समित्यांच्या सभांना नियमितपणाने उपस्थिती, विषयपत्रिकेचे वाचन व टिपणे, प्रशासनातील त्रुटी दाखविणे व नागरिकांच्या हितासाठी प्रस्तावाचे समर्थन वा विरोध अशी अनेक कामे जागरूक लोकप्रतिनिधींना सतत करावयास पाहिजेत.

**नेतृत्व उभारणी**

स्थानिक पातळीवर महिला लोकप्रतिनिधी एवढ्या प्रचंड संख्येत आल्यामुळे त्यांची नेतृत्व उभारणी ही गोष्ट अधिक महत्वाची आहे. तसे पाहिल्यास स्थानिक राजकारणात सक्रीय महिलांची संख्या मूळात फार कमी महिला काही पदांवर व स्थानिक पातळीवर कार्यरत होत्या की त्यातील काही लोकप्रतिनिधी बनल्या. काही स्त्रिया शहर पातळीवरील राजकारणात व महानगरपालिका / नगरपरिषदा यांमध्ये ओढल्या गेल्या कारण त्यांची कुटुंबे स्थानिक पातळीवर राजकारणात सक्रीय होती. पती, वडील, भाऊ वा अन्य नातेवाईकांचा मतदारसंघ राखीव घोषित झाल्याने निव्वळ अपघाताने त्या स्थानिक राजकारणात आल्या. काही कागदी नगरसेविका ठरल्या, कारण बऱ्याच वेळा प्रत्यक्ष कामे त्यांच्या घरातील पुरूष मंडळीच हाताळताना दिसतात. काही शहरांमध्ये हे चित्र अजूनही दिसून येते. राखीव जागा नसल्या तर त्यांना लोकप्रतिनिधी बनण्याची संधी कधीही मिळाली नसती. हे सर्व पक्षीय नगरसेविका आवर्जून सांगतात. काही कर्तृत्ववान महिला / लोकप्रतिनिधी ही आहेत की ज्यांना महिला धोरणामुळे संधी मिळालेली आहे व त्या प्रभावीपणे काम करत आहेत. परंतु अशांची संख्या फारच थोडी दिसून येते. या पार्श्वभूमीवर एवढ्या मोठ्या संख्येने पुढे आलेल्या महिलांच्या नेतृत्व उभारणीकडे अधिक लक्ष देणे हे सर्व राजकीय पक्षांच्या दृष्टिने महत्वाचे आव्हान ठरले आहे.

**शहरातील लोकप्रतिनिधी**

महिलांनो, हे लक्षात ठेवा की तुम्ही आता तुमच्या शहरातील 'वार्डाच्या' प्रतिनिधी आहात. तुमच्या विभागात निवडून आल्यामुळे तुम्ही आता तुमच्या महानगरापलिका / नगरपरिषदा यामध्ये लोकप्रतिनिधी झाला आहात. लोक आज तुमच्याकडे 'एक नेता' म्हणून पाहत आहेत. तुमच्याकडे आपल्या विभागातील कामे व समस्या सोडविण्याबाबत अपेक्षेने पाहात आहेत. ज्या लोकांनी तुम्हांला निवडून दिलेले आहे, त्यांच्या समस्या सोडविणे हे तुमचे प्रमुख काम आहे, आणि म्हणून -

- आपआपल्या विभागातील सर्व नागरी समस्या नीट समजावून घ्या.
- नागरिकांशी सतत संपर्क ठेवा. आजकाल शहरातील नागरीक सुध्दा आग्रही झाले आहेत. त्यांचे म्हणणे की, 'तुम्ही आमच्या मागे आमचे प्रतिनिधीत्व करतो म्हणून आल्या आहात, आम्ही तुमच्या मागे आमचे नेते बना असे सांगितले नाही'.
- महानगर / नगरपरिषद सभेत न चुकता हजर रहा. आपल्या विभागातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक तो अभ्यास करून सूचना करा आणि त्याचा सतत पाठपुरावा करा.
- स्थानिक पातळीवर सर्वांना बरोबर घेऊन एकजूटीने काम करा.

- आपल्या विभागात आपणांस एक कार्यक्षम महिला लोकप्रतिनिधी बनायचे आहे हे लक्षात घ्या. नगरसेविका या नात्याने तुमची जबाबदारी वाढली आहे. महानगरपालिका / नगरपरिषदा व नागरिक यांना जोडणारा एक 'दूवा' म्हणून तुम्ही नीट काम केले तर नागरिकांच्या समस्या सुटण्यास मदत होईल. नागरिकांचे प्रतिनिधी व महानगरपालिका / नगरपरिषदा अधिकारी यांच्यांशी सहकार्य ठेवून नागरिकांच्या अडीअडचणी दूर करायच्या आहेत हे नेहमी लक्षात ठेवा.

**आपल्या विभागातील समस्यांचा सतत पाठपुरावा**

निवडून आल्यानंतर आपापल्या विभागात महिला लोकप्रतिनिधींचा सतत वावर असला पाहिजे की जेणेकरून नागरिकांना आपण त्याच्या खरोखरच्या प्रतिनिधी आहात असे वाटेल. आपापल्या विभागात नागरी सेवा-सुविधा नागरिकांना योग्य रितीने मिळतात की नाही ह्याकडे लक्ष ठेवणे वा असलेल्या सुविधात वाढ करणे, ही कामे लोकप्रतिनिधीस करावयाची असतात.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत सेवा सुविधा-पाणी, रस्तेसफाई, पदपथ, गटारे, कचऱ्याची विल्हेवाट, इत्यादीसंबंधी नागरिकांच्या सूचना ऐकून सोडविणे ही गोष्ट लोकप्रतिनिधींचे नियमित काम असावे. विभागातील सर्व समस्या सोडविण्यासाठी विभाग पातळीवरील प्रशासनाचे सहकार्य नेहमी हवे.

सामान्य नागरिकास लोकप्रतिनिधीची भेट वेळोवेळी घेता येईल असे मध्यवर्ती संपर्क ठिकाण / तक्रार पेटी असावी, की जेणेकरून जनतेशी कायम संपर्क राहील. प्रत्येक नगरसेविकेने आपापल्या विभागाचा नकाशा, त्यात घरांची रचना, गृहसंकुले, नाले, कचऱ्याची व्यवस्था, मोकळी मैदाने, बागा, शाळा, सरकारी कार्यालये, सार्वजनिक सभागृहे, झोपडपट्ट्या, इत्यादि माहिती ठेवल्यास विभागातील प्रश्न सोडविण्यास अधिक मदत होईल. आपापल्या विभागात नागरिकांना चांगल्या सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहताना प्रत्येक महिला लोकप्रतिनिधींने शहराच्या व्यापक हिताचे भान ठेवून निर्णय घेणे आवश्यक आहे. आपला विभाग हा मोठ्या शहराचा एक भाग आहे, ह्या दृष्टिकोनातून विभाग व शहर यांना योग्य व पूरक अशी आपल्या कामाची भूमिका ठेवून सेवा-सुविधांची काम मांडली पाहिजेत.

**नागरिक घोषणा-पत्राबद्दल जागरूकता**

आज आपण पाहिले तर प्रत्येक मोठ्या व मध्यम शहरातील प्रशासनाने नागरी सेवा-सुविधा वितरणाबाबत नागरिकांचा जाहीरनामा (Citizen's Charter) वितरित केला आहे. ह्या जाहीरनाम्यात प्रत्येक शहरातील समस्यांचा विचार करता महानगरपालिका / नगरपरिषदांमधून दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा, कार्याबद्दलची माहिती, या सेवांबद्दलचे मानदंड, त्या सेवांच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असणारे मार्गदर्शी मुद्दे, नागरी तक्रारी व त्या निवारण्यासाठी ठराविक कालावधी, इत्यादी गोष्टी नमूद करण्यात आलेल्या आहेत. नागरी सेवांच्या कामात पारदर्शकता व जबाबदारी ह्या दृष्टीकोनातून ह्या जाहिरनाम्याची कल्पना आहे की जेणे नागरि मूलभूत सेवा-सुविधा प्रशासनाद्वारे योग्यरितीने दिल्या जातात की नाही याचा पाठपुरावा महिला लोकप्रतिनिधींनी करावा. व्यवस्था प्रणाली व नागरिक यांच्यात प्रभावी संबंध निर्माण करणे ही गोष्ट महत्वाची आहे. लोकांना माहिती, साधन प्रसाराद्वारे समर्थ करण्याच्या क्षमतेवर व विभागात त्यांचे सहकार्य प्राप्त करून घेण्यात महिला लोकप्रतिनिधींचे यश अवलंबून असते. विभागातील नागरिकांची मते जाणून नेतृत्वाची पध्दत बदलली पाहिजे की, ज्यामुळे उत्तम परिणाम साधता येईल.

**नागरी गरीबीचे प्रश्न**

नागरी भागातील दारिद्र्य व त्याचे निवारण ह्यांचा प्रत्यक्ष संबंध स्थानिक प्रशासनाचा प्रतिसाद, कार्यकारी आणि नागरी सेवांची गुणवत्ता ह्यांच्याशी आहे. ७४ व्या घटना दुरूस्ती (१९९२) मधील १२ व्या कलमानुसार आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कार्यक्रमात दारिद्र्यनिवारणाचा अंतर्भाव केल्यामुळे दारिद्र्य निवारणासाठी धोरणात्मक चौकटीची निकड निर्माण झाली आहे. देशभरातील राज्यांतून महानगरपालिका / नगरपरिषदांच्या माध्यमातून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, राजीव आवास योजना, फेरीवाल्यांसाठी राष्ट्रीय धोरण इत्यादि योजना राबविल्या जातात. योजनांच्या अंमलबजावणीत विविध शासकीय विभाग व अन्य संबंधित यांच्या भूमिका व जबाबदारीची पूर्तता अगदी अत्यावश्यक आहे. योजना अंतर्गत सेवा सुविधा प्रत्यक्षात आणण्यासाठीची जबाबदारी संबंधी जाणीव महिला लोकप्रतिनिधींना अवश्य हवी.

**महिला लोकप्रतिनिधी आणि स्थानिक स्वराज्य संस्था**

७४ व्या घटनादुरूस्तीमुळे महानगरपलिका / नगरपरिषदांच्या कामाच्या कक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. घटना दुरूस्तीच्या १२ व्या परिशिष्टानुसार नागरी हिताची काम कर्तबगारीने पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या सर्व प्रक्रियेत सक्रिय भाग महिला लोकप्रतिनिधींना घेतला पाहिजे. महिला व बालके यांचे प्रश्न जाणून सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज महिला लोकप्रतिनिधीची

संख्या ५० टक्के इतकी झाली आहे आणि नागरी सेवा - सुविधा वितरणात अधिक कार्यकुशलता दाखवून स्थानिक स्वराज्य संस्थांतील आपली भूमिका सार्थ केली पाहिजे.

तसे पाहिल्यास महिला व पुरूष लोकप्रतिनिधींची नागरी सेवा-सुविधांबाबत एकच कार्यकक्षा आहे. सारख्या प्रकारचे प्रश्न त्यांना सोडवावे लागतात. परंतु महिलांच्या प्रश्नांबाबत जास्त जागरूकता दाखवून त्यांचा सतत पाठपुरावा करून, ते प्रश्न सोडवून शहरातील सर्व स्तरावरील स्त्रियांचे जीवनमान सुधारेल याकडे सातत्याने लक्ष देणे ही महिला लोकप्रतिनिधींची आर्थिक जबाबदारी आहे व ही जबाबदारी त्या जर यशस्वीरीतीने पार पाडू शकल्या तरच त्यांच्या प्रतिनिधित्वास जास्त अर्थ प्राप्त होईल.

**दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे व वाहिन्या याच्यांशी संपर्क**

आजकालचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. माहिती देण्याची व घेण्याचीही साधने वाढली आहेत. आपल्या स्वतःच्या व आपल्या विभागाच्या विकासात माहिती संकलनाचा खूप महत्वाचा वाटा आहे, त्या अनुषंगाने सर्व प्रसार माध्यमांचे महत्व महिला लोकप्रतिनिधीही समजावून घ्यायला हवे.

**प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी**

महानगरपालिका व नगरपरिषदा कार्यक्षेत्रात दाखल झाल्यावर लोकप्रतिनिधींना विविध प्रश्नांना तोंड द्यावे लागते व प्रशासनाशी संघर्षाचे प्रसंग येतात याचे कारण महानगरपालिका / नगरपरिषदा कायद्याबाबत अपुरे ज्ञान, प्रशासकीय कामकाज नियम याबाबत अपुरी माहिती व अपुरा अनुभव, नागरी सेवा-सुविधा वितरण संबंधित तांत्रिक कौशल्ये व शास्त्रशुध्द माहितीची कमतरता, स्थानिक प्रश्नांबाबत अपुरी माहिती, अंदाजपत्रक, प्रक्रियेची अपुरी माहिती, विकास प्रकल्प व शासकीय योजनांची अपुरी माहिती, सभाशास्त्राविषयी माहिती इत्यादी. म्हणून महिला लोकप्रतिनिधी ज्या विविध पक्षांतून, सामाजिक व शैक्षणिक पातळीवरून स्थानिक स्वराज्य संस्थांत येतात त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन सक्षम नेतृत्वासाठी तयार करणे ही महत्वाची बाब आहे.

लोकशाहीचा पाया बळकट करावयाच्या दृष्टिकोनातून लोकशाहीच्या या पायाचे आधारस्तंभ जे स्थानिक लोकप्रतिनिधी आहे, त्यांना प्रशिक्षित करून, या संदर्भात त्यांच्यावर महानगरपालिका / नगरपरिषदा अधिनियमान्वये जी जबाबदारी टाकण्यात आली आहे ती पार पाडण्यास त्यांना समर्थ करून, लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी व शहराचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने त्यांना सक्षम करणे, म्हणजेच लोकशाहीची पाया बळकट करणे होय. लोकशाही व्यवस्थेमध्ये स्थानिक प्रशासन महत्वाची भूमिका बजावीत असते. लोकप्रतिनिधी राजकारणाचे व प्रशासनाचे पहिले धडे गिरवितात ते स्थानिक स्वराज्य संस्थेमध्येच. या विविध समस्या हाताळत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत महिला लोकप्रतिनिधी भविष्यकाळात राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवर नेतृत्व करण्याची शक्यता असते. या दृष्टिकोनातून त्यांना विविध जबाबदाऱ्या समर्थपणाने पार पाडण्याची क्षमता बांधणी त्यांच्यात करावयाची असेल तर मूळात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे काय ? सत्तेचे विक्रेंद्रीकरण म्हणजे काय ? नागरी सेवा-सुविधा वितरण व नागरिकांच्या अपेक्षा कोणत्या ? महानगरपालिका अधिनियम व विविध नियम यान्वये लोकप्रतिनिधीची कर्तव्ये कोणती ? जबाबदाऱ्या काय ? याविषयक माहिती सर्व महिला लोकप्रतिनिधींना असणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवरील लोकशाही मजबूत करण्याचा महत्वाचा प्रयत्न हा प्रशिक्षणाद्वारे वा क्षमता बांधणीच्या माध्यमातून साध्य होऊ शकतो.

नागरी प्रशासनाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांचा कारभार एकोप्याने व परस्परास पूरक असाच व्हावयास हवा. आपापल्या विभागातील नागरिकांच्या तक्रारी व अपेक्षा महानगरपालिका / नगरपरिषद प्रशासनाकडे नेऊन त्या सोडवून घेणे व महानगरपालिका / नगपरिषदा सेवा-सुविधाविषयक निर्णय नागरिकांपर्यंत पोचवणे हे दोन्ही बाजूचे काम लोकप्रतिनिधींनाच करावयाचे असते. तेव्हाच प्रशासन व नागरिक यांच्यातही उत्कृष्ट संबंध निर्माण होतात. नागरी हिताशी नेहमीच बांधिलकी ठेवून महिला लोकप्रतिनिधींनी आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडणे हे महत्वाचे आहे.

लोकशाहीमध्ये खरी सत्ता निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या हाती असते आणि ही गोष्ट लक्षात ठेवून शहराचा सर्वांगीण विकास करणे व नागरिकांना चांगल्या प्रतीचे जीवनमान, पर्यावरण व सेवा सुविधा देणे हे त्यांच्याच हाती आहे.

समाजिक व राजकीय क्षेत्रात काम करण्याची जास्तीत जास्त संधी महिलांना मिळावी ह्या हेतूनेच राखीव जागांचे प्रमाण ठरविण्यात आले आणि आता तर ते ५० टक्क्यांपर्यंत नेण्यात आले आहे. या धोरणामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांत मोठ्या प्रमाणात महिला सक्रीय दिसत आहेत. महापौर, उपमहापौर पद, महत्वाच्या समित्यांची अध्यक्षपदे महिलांना मिळाली आहेत. काही राज्यांनी आळीपाळीने महापौर पदे महिलांना देऊ केली आहेत.

काही शहरात नागरी सेवा सुविधा वितरणाबाबत वा अंदाज पत्रकाच्या चर्चेत महिला हिरीरीने भाग घेताना दिसत आहेत. परंतु

अजूनही पुष्कळ वेळा महिला नगरसेविका 'राखीव विभागामुळे' घरातील पुरूष वा अन्य नातेवाईकांच्या बदली निवडणूक लढवित असल्याकारणाने आपली भूमिका 'रबरस्टँम्प' इतकीच ठेवत आहेत व प्रत्यक्ष कारभार घरातील पुरूषांमार्फतच होतांना दिसतो. अश्यावेळी नेतृत्व बांधणी आणि व्यक्तिमत्व विकास ह्या गोष्टी दडपल्या जातांना दिसतात. या बाबतीत काय करता येईल हा एक मुख्य प्रश्न आहे.

एकंदरीत नागरी प्रश्नांचा आवाका पाहता पुरूष व महिला लोकप्रतिनिधींना सारख्याच प्रकारचे प्रश्न हाताळावे लागतात. नागरी प्रश्नांबाबत त्यांचा काही वैशिष्टपूर्ण असा स्त्रीवादी दृष्टीकोन आढळत नाही. परंतु पाणी पुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, सुतिकागृहे, दवाखाने, बालकल्याण केंद्रे, प्राथमिक शाळा, भाजी मंडई, इत्यादीबाबत महिला नगरसेविकांनी अधिक लक्ष द्यावे अशीच नागरिकांची अपेक्षा आहे.

नागरी सुविधांच्या वितरणाच्या दर्जाबाबत महिला लोकप्रतिनिधींनी या सेवांचा दर्जा अधिक सुधारण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. महिला प्रतिनिधी या गोष्टींकडे विशेष लक्ष देत आहेत काय ? राजकारण व नेतृत्व विकास या बरोबर या गोष्टींचीही आवश्यकता आहे. शहरातील महिला व बालके यांना एकात्मिक, सामाजिक व आर्थिक सेवा पुरविण्याच्या दृष्टिने महिला नगरसेविकांनी लस्सीकरण, सकस आहार, आरोग्य, शालेयपूर्व आणि प्राथमिक शिक्षण, सामाजिक जाणीव यासारख्या कार्यकक्षांवर अधिक लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

आपल्या समाजात अगदी शहरात सुध्दा लैंगिक अत्याचार, अनारोग्य, बालिका मृत्यू, शिक्षण व प्रशिक्षण, हुंडाबळी, परित्यत्कता व एकट्या स्त्रियांचे प्रश्न, समान काम समान वेतन, निर्णय प्रक्रियेत दुय्यम स्थान, चरित्रहननाचे वापरले जाणारे हत्यार, इत्यादि विविध प्रश्नांमुळे स्त्रियांच्या प्रगतीस खीळ बसते. या सर्व प्रश्नांकडे लक्ष देऊन ते सोडविण्याच्या दृष्टिने सतत पाठपुरवठा करण्यासाठी महिला नगरसेविका काही विशेष प्रयत्न करत आहेत का ? आणि नसतील तर का ? आपले कार्यक्षेत्र हे नागरी सेवासुविधा वितरण इतकेच मर्यादित न ठेवता, समाजातील सर्व स्तरावरील स्त्रियांचे प्रश्न सोडविण्याबाबत कार्यव्याप्ती असणे ही आजच्या काळाची गरज आहे. अनेक आर्थिक व सामाजिक प्रश्नांचा व्यापक पातळीवरून पाठपुरावा करायचा प्रयत्न लोकांनी निवडून दिलेल्या महिला लोकप्रतिनिधीनी करायला हवा. स्थानिक पातळीवर नेतृत्व विकासात ही गोष्ट महत्वाची ठरणार आहे. आज महिला नगरसेविकांकडून नागरीक जास्त अपेक्षा बाळगून आहेत. ही गोष्ट मात्र खरी.

गेल्या वीस वर्षाच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थात महिला नगरसेविकांचा प्रवास पाहता महिलांमध्ये नेतृत्व उभरत आहेत. राजकारणाच्या प्रवाहात आपल्या पदाच्या महत्वतेची जाणीवही त्यांना होऊ लागली आहे. आपणही नागरी प्रश्नांबाबत काही करू शकतो हेही त्यांना माहीत झाले आहे. याचकारणाने महानगरपालिका व नगरपरिषद प्रशासनात आणि नागरी सेवा सुविधा वितरणात महिला सदस्यांचा सहभाग अधिक परिणामकारक व फलदायी होण्याच्या दृष्टीने योग्य ते प्रशिक्षण व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याची भूमिका प्रभावीपणे वटविण्यासाठी योग्य प्रशिक्षणाची गरज आहे.

महिला नगरसेविकांना महानगरपालिका / नगरपरिषदा कायदे, सभाशास्त्र, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी कामे, विविध नागरी मूलभूत सेवा, इत्यादी विषयक मार्गदर्शन देऊन त्यांच्यात अधिक कार्यक्षमता निर्माण करून त्यांच्या भूमिका पार पाडण्यात व त्यांच्या मतदारांच्या आकांक्षा पूर्ण करण्यात आणि त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यात हातभार लावण्याची आवश्यकता आहे.

सामाजिक बांधिलकी लक्षात ठेवून महिला नगरसेविकांनी शहरातील प्रश्नांकडे बघितले पाहिजे. आपआपल्या विभागातील नागरिकांना योग्य नागरी सुविधा उपलब्ध होतील यासाठी प्रयत्नशील असतांना शहरांच्या समग्र विकासाचे भान ठेवणेही महत्वाचे आहे. महिलांचा सामाजिक व राजकीय दर्जा वाढविण्याच्या हेतूने एक तृतीयांश (आता ५० टक्के) जागा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना आरक्षित ठेवण्यात आल्यानंतर महिलांना ही संधी मिळाली आहे, नागरिकांच्या जीवनमानात खरोखरीची सुधारणा होईल या दृष्टिनेच महिला लोकप्रतिनिधींनी काम करायचे आहे. अर्थात सर्वच राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेतेमंडळींनी सर्व पातळयांवर आणि पक्ष पातळीवर महिलांचा सहभाग अधिक प्रभावी कसा होईल याकडे जास्तीत जास्त लक्ष देणेही तितकेच महत्वाचे आहे.

**- डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर,**
संचालिका,
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

❐❐❐

स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३टक्के आरक्षण मिळून जवळपास दोन दशके होत आली आहेत. राज्य कारभारात जास्तीत जास्त समाज घटकांचा समावेश व्हावा, त्यांची भागीदारी वाढावी या उद्दिष्टाने महिलांना आरक्षण देण्यात आले. आरक्षणांतर्गत आरक्षण दिल्यामुळे अनुसूचित जाती,जमाती व अन्य मागासवर्गीय महिलांनाही राज्यकारभारात येण्याची संधी मिळाली. आरक्षणानंतरची पहिली ६-७ वर्ष संमिश्र प्रतिसादातच गेली. एक तर या ''आरक्षण धोरणाची'' ताकद विशेष कुणाच्याच ध्यानी आली नव्हती. अगदी राजकारणात मुरलेल्या प्रस्थापितांनाही यातून काही ''धोका'' त्यांना तयार होऊ शकेल असे त्यांच्या गावीही नव्हते. तसेच महिला चळवळ, संघटना त्यांना ही या संधीतून एक वेगळेच दालन उघडणार आहे, त्याच्या ताकदीचा अवाका आला नव्हता. खरं म्हणजे वरील दोन्ही गटात ३३टक्के महिला आरक्षणातून विशेष काय घडणार आहे; हीच भावना होती. एकाची हेटाळणी तर दुसऱ्या विभागाची उदासीनतेची.

या पार्श्वभूमीवर पहिले दशक चाचपडत पार पडले. जिथे महिलांनी निवडून आल्यावर काही वेगळी कामें केली; त्याचे कौतुक झाले. मदतीला काही लोक पुढे आले. यशस्वी कहाण्यांचा गवगवा झाला; पण त्या सगळयाकडे प्रस्थापित राजकारण्यांकडून फार गांभीर्याने बघितले गेले, असे झाले नाही. लहान मूल जसं पाऊल टाकताना धडपडतो, इतर कौतुकाने बघतात,तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एका मागून एक निवडणुका होऊ लागल्यावर या आरक्षणातील ताकद लक्षात येऊ लागली. निवडणुकीला उभी राहणारी महिलांची पॅनेल्स, महिलांनी जुन्या कारभार पध्दती विरूध्द उठवलेले आवाज, आरक्षणाच्या सोडतीची जुन्या जाणत्यांना बसलेली धास्ती, शक्यतोवर, ''रबर स्टॅम्प'' म्हणून बसणाऱ्या महिलांचा घेतला जाणारा शोध,यातून पुरूष वर्चस्व वृत्तीला बसलेले हादरे जाणवू लागले होते.

महिलांच्या गोड-कौतुकाचा काळ ओसरू लागला. स्थानिक स्वराज्य संस्थेत अचानक ''अविश्वास'' ठरावाचे पिक येऊ लागले. जरा वेगळे काम करणाऱ्या महिलेला लगेच अविश्वास ठरावाच्या बेड्यात अडकविण्यात येऊ लागले. प्रोसिडिंग मधली एखादी तांत्रिक चूक त्यासाठी पुरेशी ठरू लागली. 'तीन अपत्य' असल्यास निवडणुकीला अपात्र ठरविण्याचा कायदा संमत झाला. या शिवाय मारहाण, नवरा किंवा घरातल्या पुरूषाला चिथावणे आणि सर्वात शेवटी महिलेच्या विरूध्द सगळयात सोपे हत्यार म्हणजे तिचे चरित्र हनन करणे याला महिलांना सारखे तोंड द्यावे लागत आहे. बायकोच्या जागी स्वतःच कारभार बघणारे ''सरपंचपती'' महाभागांची संख्याही ही मोठी आहे.

ग्रामपंचायत स्तरावरील महिला प्रतिनिधींनी या सर्व अवघड प्रवासाला फार चिकाटीने व धीराने तोंड दिले. त्यामानाने पंचायत समिती, नगर परिषदा, महानगरपालिकेत निवडून येणाऱ्या महिला प्रतिनिधींचा ठसा उमटलेला दिसत नाही. उलट ग्रामीण पेक्षा शहरातली महिला प्रतिनिधींच्या भागीदारीची परिस्थिती वाईट दिसते. ग्रामीण भागात काही प्रमाणात महिला, कारभारांत पुढे जाऊ शकल्या. याच्या कारणांचा शोध घेतल्यावर काही मुद्दे पुढे येतात. पहिली गोष्ट म्हणजे ''गाव'' याचा आकार आणि तिथली सामाजिक समीकरणे. निवडून येणाऱ्या महिलेच्या डोळयासमोर तिचा गाव पसरलेला असतो. तिला तिथले बारकावे माहित असतात. उदा. आंगणवाडीसाठी जागा, महिलांच्या पाण्याचा प्रश्न, बचत गटामार्फत मिळणारे अर्थसहाय्य, त्यामुळे नेमकी गरज काय आहे याबाबत तिला अंदाज येऊ शकतो. दुसरे शहराच्या तुलनेने आर्थिक व्यवहार, बजेट ही कमी असते. तिसरे म्हणजे लाभार्थीबाबत वैयक्तिक माहिती असण्याची शक्यता बरीच असते. गावात ''सपोर्ट'' गट म्हणून बचत गट बनवून, त्यातील सक्रीय महिलांची फळी मदतीला घेता येते.

आणि सगळयात जमेची बाजू म्हणजे ग्रामपंचायत स्तरावरील निवडणुका ''पक्षनिहाय'' होत नाही. जरी आडून-आडून कुठल्या न कुठल्या पक्षाला मानणाऱ्यांचे वर्चस्व असले तरी वेगवेगळया हितसंबंधाच्या पॅनेल्स बनविण्यासाठी लवचिकता असते. अर्थात या सर्व गोष्टींमुळे कारभारणींना मार्ग सोपा आहे असे अजिबात नाही. गावातील जातीची समीकरणे, निरक्षरता, पुरूषी वर्चस्वाचा जाच, कुटुंबातल्या जबाबदाऱ्या, आर्थिक कमकुवतपणा या सर्व अडसरांना जबरदस्त तोंड द्यावे लागतेच. मात्र महाराष्ट्रात अशा धडपडणाऱ्या कारभारणींपर्यंत कष्टपूर्वक पोहोचलेल्या संस्था, संघटना, पंचायत भारती, महिला राजसत्ता आंदोलन अशासारख्या संघटनांनी गाव पातळीवरील महिलांना, सक्षम करण्यास त्यांच्या नेमक्या गरजा, अडचणी ओळखून त्यातून नानाविध मार्ग काढले त्यांच्या पर्यंत जी.आर.चा कागद पोहोचविणे, त्यांना बजेट नियोजन

समजाविणे, गावातील अन्य महिलांचा भक्कम आधार गट तयार करणे, महिलांच्या प्रश्नाबाबत दृष्टीकोण देणे, त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, सरकारी दरबारी जाऊन त्यांच्या प्रश्नाची तड लावणारी कार्यकर्त्यांची फळी तयार करणे अशा एक ना अनेक तऱ्हेने ''सरपंचपती'' ऐवजी स्वतः कारभार करायची ताकद अक्षरशः शेकडों महिलांमध्ये उभी केली.

अशा टप्प्यावर महिला आरक्षणाचा प्रवास सुरू असतांना महाराष्ट्रात गेल्या वर्षी स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५०टक्के आरक्षण देण्यात आले. संख्याबळ वाढले, त्याने बुजरेपणा कमी होऊन सामुदायिक ताकद वाढण्याची शक्यता तयार झाली मात्र या प्रवासात ग्रामपंचायती पलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला विशेष काही करू शकलेल्या जाणवत नाही. प्रामुख्याने महानगरपालिकेत तर दुरावस्थाच जाणवते. आणि म्हणून या दृष्टीने समविचारी संघटना, संस्था, व्यक्ती याचा वेध घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

शहरी भागातील एक अडचण म्हणजे मतदार संघाचा पसारा खूप मोठा आहे. मुंबई सारख्या महानगरात महानगरपालिकेच्या एका वॉर्डाची लोकसंख्या किमान २५,००० ते कमाल ५४,००० एवढी प्रचंड आहे. त्यामुळे मतदारसंघाचा आवाका येणे अवघड होऊन बसते. दुसरे म्हणजे इथल्या निवडणुका या पक्ष पातळीवरच लढविल्या जातात खरं तर स्थानिक प्रश्नाबाबत निवडणूक पक्ष निहाय नसणे जास्त योग्य आहे, पण असो. सध्यातरी असे आहे. इतक्या मोठ्या मतदारसंघात निवडून यायचे, मग जे निकष ठरविले जातात, त्यात निवडून येण्याची शक्यता म्हणजे तिच्याकडे असलेले मनुष्य व आर्थिक बळ हे महत्त्वाचे ठरते. निवडून आल्यावर पक्ष आदेशाप्रमाणेच सभागृहात काम करायचे असते. त्यामुळे या महिलांच्या राजकीय शिक्षणाची गरज ना पक्षाला वाटते ना त्या महिलेला. महिलांच्या वाटेला ठरलेला विभाग म्हणजे 'महिला बाल कल्याण समिती' म्हणजे तुम्ही महानगरपालिकेत निवडून जरी आलात तरी ''तुमचे'' विषय तुमच्याकडे हा दृष्टीकोण आहे. फार फार तर एखादीला शिक्षण समितीत जागा मिळते. पण त्यापलीकडे कुठल्या ही समितीत तिला स्थान बहुधा नसतेच. जसे महिला-बाल-शिक्षण हे महिलांचे विभाग तसेच स्थायी समिती, बजेट, टेंडर्स हे पुरूषांचे विभाग अशी जणू सर्वमान्य विभागणीच झाली आहे. पक्षाच्या बहुमताचा संख्येवर चालणारे राजकारण असल्याने तिकीट देण्यापासून सभागृहात एखाद्या ठरावावर मतदान करण्यापर्यंत ''ती'' ला संख्याबदलाचा भाग म्हणून गृहित धरले जाते.

सर्व पक्षांच्या महिला आघाड्या आहेत. पण त्याही राजकीयदृष्ट्या कमकुवत आहेत. तिथे ही प्रश्न असतो. आर्थिक स्त्रोतांचा. महिला आघाडीला अजूनही महिला मेळावे देऊन शक्ती प्रदर्शन करण्यातच बरेचदा गृहित धरले जाते. तिकीट वाटपाच्या वेळी महिला आघाडीतील महिलांना फार भांडावे लागते. एखादा मतदारसंघ जर ओपन ऐवजी ओ.बी.सी. आरक्षित झाला की तिथल्या पक्षातील कार्यकर्त्याला आपसूक बाजूला होऊन शक्यतोवर आपल्या गटातील ओ.बी.सी. कार्यकर्त्याची वर्णी लावण्याखेरीज इलाज नसतो. तिची जागा जर पुढच्या खेपेला अनुसूचित जाती / जमातीसाठी आरक्षित झाली तर तोही नाईलाजाने बाजूला जातो. पण पुढच्या वेळी जर ती जागा महिलांसाठी आरक्षित झाली तर सगळयांकडे इलाज असतो, ते म्हणजे घरच्या महिलेलाच पुढे करायची. इतकी हक्काची व्यक्ती असल्यावर महिला आघाडीतल्या एरवी सक्रीय मानल्या जाणाऱ्या महिला सहज बाजूला टाकल्या जातात. कारण निवडून येण्याची हमी तो पक्ष कार्यकर्ता स्वतःच्या पत्नीबाबत घेतो. मात्र महिला कार्यकर्तीबाबत घेत नाही. याचे आणखीही एक कारण म्हणजे वॉर्डात येणारी मोठी कंत्राटे, त्याचे टेंडर्स हे व्यवहार स्वतःच्याच हातात ठेवायची नामी संधी त्याला मिळते.

मतदारसंघ मोठा असल्यामुळे आणखी एका समस्येला शहरी महिलांना तोंड द्यावे लागते; ते म्हणजे गावासारखी इथे व्यक्तिगत ओळख असण्यावर खूप मर्यादा येतात. त्यामुळे जनसंपर्कासाठी बराच वेळ द्यावा लागतो. रात्री उशीरापर्यंत जे थांबावे लागते तिथे महिलांची कसोटी लागते; अर्थात राजकारणात येणाऱ्या महिला व पुरूषांमध्ये आपल्या सामाजिक परिस्थितीमुळे एक मूलभूत फरक आढळतो. घराबाहेर पडणाऱ्या महिलेला घर, संसार, मुलं आजारपण हे सगळं करून सवरून, सोय लावूनच बाहेर पडावे लागते. इतके करून ही अर्धे चित्त घरातच घुटमळत असते. या उलट पुरूषांना वरील जबाबदारीतून पूर्ण मुक्तता मिळालेली असते, त्यांच्यावर या दुहेरी ताणाचे सावट सुध्दा नसते. कारण अजूनही महिला राजकारण ''तात्पुरते'' व संसार 'कायमचा' या जबाबदारी व मनोभूमिकेत असतात. तर पुरूष संसार गृहित धरूनच राजकारणाची आखणी करायला मोकळे असतात.

आणखी एक प्रश्न असतो आर्थिक कुवतीचा. कामासाठी, प्रवासात, कार्यक्रमासाठी निधी उभारण्याचे महिलांचे स्त्रोत फारच तोकडे पडतात. पुरूषांना हा निधी बरेचदा टेंडर, कंत्राटे याच्या टक्केवारीतून मिळत असतो. त्यामुळेही पक्षात कुणीतरी गॉड फादर असला तर टिकून रहाणे महिलांना सोपे वाटते. यात ही गंमत अशी आहेकी पुरूषाने हे टक्केवारीचे राजकारण केले, पैसे खाल्ले तर त्याला असे राजकारणात करावेच लागते. याला समाज मान्यता असते. मात्र एखादी महिला अशा व्यवहारात तरबेज झाली तर महिला असूनही असे वागते याबाबत ती टीकेची धनी होते. "महिलांना आरक्षण दिलयं ते स्वच्छ कारभार करण्यासाठीच" ह्या अपेक्षेचे ओझे सध्याच्या बरबटलेल्या राजकारणात त्यांच्यावरचं टाकले गेले आहे.

महानगरपालिका हद्दीतील कारभाराबाबत आणखी ही गुंतागुंतीचे प्रश्न तयार होत आहेत. उदा. केंद्र सरकार वा राज्य सरकारकडून जर विकास कामाला किंवा एखाद्या प्रोजेक्टला मोठा निधी लाखो-कोटीमध्ये दिला जातो, त्याकरिता काही अटी मान्य कराव्या लागतात. त्यामुळे मोठ्या शहरांचा विकास, आखणी तिथल्या स्थानिक स्वराज्य संस्थेत न ठरता जिथून निधी येतो त्याप्रमाणे ठरू लागली आहे. म्हणजे स्थानिक लोकांनी स्वतः ठरविण्याच्या लोकशाही हक्कालाच बायपास केले जात आहे. बरेचदा एखादा ठराव संख्याबळावर पारित करून घेण्यासाठी अजूनही राजकारण नवख्या असलेल्या, काही वेळा पतीने स्वतःच्या सोयीसाठी निवडणूकीत उभं रहायला भाग पाडलेल्या बहुसंख्य महिलांच्या अज्ञानाचा उपयोग पक्षांना सहज करून घेता येणार आहे हा ही धोका लक्षात ठेवायला हवा.

त्यामुळे शहरी भागात महिला आरक्षणाच्या धोरणाला बळ देण्याचे मोठे आव्हान समोर आहे. महिला संघटनांना यासाठी स्वतःची तयारी करावी लागणार आहे. संघटनेतील महिलांनी निवडणुक़ीच्या राजकारणाकडे सकारात्मक बघावे लागेल. संस्था, अभ्यासक याची फळी उभी करावी लागेल. पक्षाच्या महिला आघाडीचे स्वरूप बदलण्यासाठी प्रयत्न करावा लागेल. त्याचप्रमाणे अविश्वास ठराव, सलग दोन टर्म आरक्षण अशा प्रश्नाबाबत कायदेशीर झगडा उभा करावा लागेल. ग्रामीण भागातील हजारो कारभारणी आता जुना अनुभव गाठीला घेऊन जिल्हा परिषद, पंचायत समित्या इथे निवडून येण्यासाठी संघर्ष करीत आहे. त्या अनुभवाची साथ आहे तर त्यांच्या अडचणीला तोंड द्यायचे बळ देण्याची जबाबदारी ही शहरी कारभारणीवर आहे. या सत्तेच्या भूलभुलैयातून लोकांसाठी राजकारण करण्याचा मार्ग काढायचा तर कोणत्या पायऱ्या चढायच्या, कोणत्या टाळायच्या हे शिकावेच लागेल.

आज आपण म्हणतो महिलांसाठी ५०टक्के आरक्षण आहे हे खरं नाही. महिला अन्य खुल्या जागांवर ही उभ्या राहू शकतात, म्हणजे बंधन आहे ते पुरुषांवरच. कारण ते ५०टक्के पेक्षा जास्त जागांवर उभे राहू शकत नाही. म्हणजे आरक्षण एकाप्रकारे पुरूषांना आहे. अर्थात ही ताकद आपल्या व्यवहारातून व्यक्त होऊ शकेल. म्हणून राजकारणात येणाऱ्या महिलेने आधी स्वतःला काही प्रश्न विचारायला हवे आणि पुढे जाऊन समाजाकडून त्याची उत्तरे मिळवायची ताकद कमवायला हवी.

'असे का' ?

बाया सगळ्या खस्ता खायला,
पुरुष सगळे धोरण ठरवायला ।।
महिला साऱ्या राब राबायला,
गडी समदे नियोजन करायला ।।
आया बहिणी कष्ट करायला,
बापे सारे बजेट बनवायला ।।
असे का ?

**भारती शर्मा**
महाराष्ट्र महिला परिषद

❒❒❒

# संवाद कारभारणीशी

## नगरसेविका ॲड. वसुधा कऱ्हाड यांची मुलाखत

व्यवसायाने वकील असलेल्या श्रीमती वसुधा कराड, या गेल्या वीस वर्षाहून अधिक काळ, नाशिक महानगरपालिकेच्या राजकारणात सक्रीय आहेत. सक्रीयच नव्हे तर या वीस वर्षापैकी पंधरा वर्षे त्या नगरसेविका राहील्या आहेत व आपल्या अभ्यासूपणा, कष्ट व नेतृत्वगुणांमुळे त्यांनी आपला वेगळा ठसा स्थानिक राजकारणामध्ये उमटवला आहे. राजकारणात उतरायचे पैसे मिळवण्यासाठी व अधिक पैसे मिळवायचे राजकारण करण्यासाठी अशा दुष्टचक्राचे बळी न होता, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्या असलेल्या वसुधाताई, निवडणूकांकडे व्यापक समाज बदलाच्या लढाईतील हत्यार म्हणूनच पाहतात. राजकारणात कशासाठी पडायचे याचा हेतू मनात स्पष्ट असल्यामुळे व त्यासाठीची वैचारीक बैठक पक्की असल्यामुळे त्या कधी यशाने हुरळून गेल्या नाहीत ना पराभवाने खचल्या.

स्वतःच्या जडण घडणीबद्दल बोलतांना त्यांनी घरातील राजकीय-वैचारीक वारश्याचा उल्लेख केला. त्याला दिलेली अभ्यासूपणा व कष्टाची जोड देखील महत्त्वाची आहे. कॉलेजच्या दिवसात वक्तृत्व स्पर्धांतील सहभाग व त्या निमित्ताने अभ्यासाव्यतिरिक्त झालेले अवांतर वाचन यातून आपल्याला खूप फायदा झाला असे त्या सांगतात. स्वतःचे वडील राजकारणात सक्रीय असल्यामुळे, घरात येणारे नेते, कार्यकर्ते, विचारवंत यांना लहानपणापासून जवळून बघता आले व त्या सर्वांचा अमीट ठसा आपल्या मनावर उमटला असे त्या सांगतात. यात स्वर्गीय नाना मलुसरे या उत्तर महाराष्ट्रातील अनेक डाव्या कार्यकर्त्यांच्या गुरूस्थानी असणाऱ्यांचे नाव ते आवर्जून नमूद करतात. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या व आपल्या मनाला खटकणाऱ्या गोष्टी आपण बदलू शकतो हा विश्वास त्या ध्येयासाठी राबणाऱ्या माणसांच्या सहवासातून मिळतो. फक्त पुस्तके वाचून तो येत नाही हे एक महत्वाचे प्रतिपादन त्यांनी केले.

राजकारणात व विशेषतः नागरी राजकारणात राजकीय आकांक्षा घेवून येऊ पाहणाऱ्या तरूण, होतकरू स्त्रीयांना त्यांच्या अनुभवातून काय धडे मिळू शकतात, हे त्यांच्याच शब्दात.

स्त्री म्हणून राजकारणात भाग घेतांना, पुरुष नगरसेवक, पुरूष नेते मंडळी वा नोकरशाही यंत्रणेकडून काही भेदभावाची भावना आपली कधीच झाली नाही. पण यासाठी आपण कसे वागतो, बोलतो, काम करतो हे खूप महत्त्वाचे आहे. चळवळीचे पाठबळ, कायद्याचे ज्ञान, यंत्रणा कशी चालते याचे बारकावे माहीत असणे व सर्वात मुख्य म्हणजे आपल्या वागण्यातील नीतीमत्ता यामुळे पुरूष प्रधान व्यवस्था देखील स्त्री कार्यकर्तीला वचकून रहाते. नगरसेविकांनी रात्री- बेरात्री चालणाऱ्या पार्ट्या, पैशाच्या पाकिटांचे व्यवहार यात भाग घेतला की हीच यंत्रणा तुमची किमंत करते. आपल्या समाजात पुरूषाचे बद-चारित्र्य व भ्रष्ट वागणे खपवून घेतले जाते, त्या प्रमाणात स्त्री कार्यकर्ती वा नगरसेविकांना स्वातंत्र्य नाही ही वस्तुस्थिती आहे. हे लक्षात ठेवून स्त्री नगरसेविकांनी आपले चाल-चलन ठेवावे असे वसुधाताई आवर्जून सांगतात.

स्त्री म्हणून समाजकारण-राजकारण करतांना घर, संसार, मुले यांचा सांधा कसा घालायचा हा स्त्री कार्यकर्त्यांना नेहमीच सतावणारा प्रश्न आहे व राहील. त्याची सोडवणूक साधी नाही हे त्या मान्य करतात. पण प्रत्येक स्त्रीने आपले व्यक्तीगत आयुष्य, कौटुंबिक नात्यातील संबंध सांभाळावेत, कारण त्यातून तिची स्वतःचीच प्रतिमा लख्ख रहाते हे वसुधाताई स्वतःच्या आईकडून शिकल्या. स्वतःच्या मुलाच्या दहावी-बारावीच्या दोन वर्षात मी पूर्णवेळ मुलासाठी दिला व त्यामुळे आमचे आई-मुलाचे संबंध चांगले राहीलेत. घरात पाहूणे येणार असतील तर मी माझी बाहेरची कामे ठेवत नाही. अशी काही सूत्रे त्यांनी सांगितली. समाज राजकारणातील यश हे व्यक्तीगत आयुष्यातील पोकळी भरून काढू शकत नाही. उलटपक्षी, राजकारणात अपरीहार्य पणे येणाऱ्या अपयशाच्या काळात भरीव व्यक्तीगत आयुष्य मनाला स्थिरता देण्यास मदत करते हे मुद्दामहून लक्षात ठेवले पाहिजे.

घराबाहेर समाज-राजकारण करतांना घरच्यांचा सक्रीय पाठिंबा मिळवला पाहिजे असे त्यांना वाटते. नुसता तोंडदेखला पाठिंबा नाही तर स्त्रीच्या राजकीय आकांक्षा घरच्यांनी समजावून घेतल्या पाहिजेत. वसुधाताईचे पती कॉम्रेड डॉ.डी.एल.कराड हे स्वतः नाशिकमधील नावजलेले ट्रेड युनियनचे नेते आहेत. त्यामुळे त्यांचा पाठींबा असतोच असतो. पण आई सकट माहेरच्यांशी आपण जाणीवपूर्वक संबंध ठेवले व त्याचा फायदा झाला. मुलगा शाळेत असतांना आईची खूप मदत झाली. तुझी आई तुला टाकून मजा करायला गेलेली नाही तर ती आपल्या समाजासाठी चांगले काम करत आहे हे आजीने नातवावर केलेले संस्कार खूप महत्वाचे

असतात असे त्यांना वाटते. बाहेर मान सन्मान व घरात रक्ताच्या लोकांकडून, मुलांकडून अवहेलना हे चांगले चित्र नाही हे स्त्रियांनी लक्षात ठेवले पाहिजे.

नोकरी करून राजकारण करणे अशक्य असते. अपवाद शिक्षक-प्राध्यापक पेशाचा म्हणता येईल. पण वकीली, डॉक्टरी व आजकाल तयार झालेले अनेकानेक स्वयंरोजगार हे राजकीय आकांक्षा ठेवणाऱ्या स्त्रियांनी अंगिकारली पाहीजेत. गेली वीस वर्षे वसुधाताईनी कधीही वकीलाचा काळा डगला अडगळीत फेकून दिलेला नाही. चार पैसे तर मिळतातच व त्यातून येणारे स्वावलंबीत्व महत्वाचे आहे. त्याशिवाय समाजात आपली ओळख प्रस्थापित होण्यासाठी व आपली स्वतःच्या मनातील प्रतिमा उजागर राहाणाऱ्यासाठी हे महत्वाचे आहे.

अपक्ष म्हणून राजकीय आकांक्षा ठेवणे व त्यासाठी जीवाचे रान करणे यापेक्षा आपल्या विचारांच्या जवळ असलेल्या पक्ष, संघटनांचे प्रतिनिधी म्हणून निवडणूका लढवाव्यात. हे खरे आहे की आपल्याला हवे त्यावेळी तिकीट मिळतेच असे नाही. पण पक्ष, संघटनांकडे असलेली यंत्रणा, त्याचे गुडवील यापासून अपक्ष उमेदवार पारखा राहतो. हल्ली राखीव जागा सोडतीने ठरवण्यात येतात. त्यामुळे आपण बांधलेल्या मतदारसंघात एका सकाळी आपल्याला कळवले जाते की तुम्ही अर्हताप्राप्त नाही आहात. पक्ष / संघटनाकडे एकाचवेळी अनेक जातीचे (स्त्री व पुरूष) उमेदवार इच्छुक असतात. अशावेळी केलेले काम त्या नवीन उमेदवाराच्या कामी येते. अगदी अशाच परिस्थितीतून वसुधाताई देखील २०१२ च्या निवडणूकीतून गेल्या. त्यांनी उभा केलेला मतदारसंघ अनुसूचित - जमातीसाठी राखीव झाला व त्यांना दुसऱ्या वॉर्डातून उमेदवारी स्वीकारावी लागली. पण पक्षाकडे अनुरूप उमेदवार स्त्री असल्याने तिला तिकीट देण्यात आले व ती निवडून देखील आली. वसुधाताई दुसऱ्या ठिकाणाहून हरल्या तरी आपण घेतलेले कष्ट कारणी लागल्याचे समाधान मिळाले असे त्यानी नमूद केले.

निवडणूका लढवण्याची आकांक्षा ठेवणे चांगले; पण सामान्य लोकांसाठी आंधळेपणाने राब राब राबणे यातून तुम्ही जिंकून यालचं याची काही शाश्वती नसते. याचे कारण संसदीय निवडणूका जिंकण्याचे एक विशिष्ट तंत्र गेल्या वीस वर्षात विकसीत झाले आहे. पैसे देवून मते विकत घेणे एवढ्या पुरतेच ते मर्यादित नाही. तर मतदार याद्या तयार होतानाच आपल्याला बांधिल राहू शकणाऱ्या खऱ्या, खोट्या मतदारांची नावे घुसडण्यातून यांची सुरवात होते. मतदानाच्या दिवशी मतदारांना धाक दपटशा, मतपेट्याच गायब होणे हे प्रकार तर सर्वांनाच माहीत आहेत. थोडक्यात आपण खूप चरीत्रवान आहोत, स्वच्छ आहोत, नितीवान आहोत अशा घमेंडीत रहाता कामा नये. तुमच्या विरोधकांच्या गुंडा गर्दीला पुरून उरेल व त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्याइतकी रस्त्यावर उतरून ठोशाच ठोसा देणारी यंत्रणा तुमच्याकडे देखील पाहिजेत. आपल्या हरण्याचे खापर सारखे भ्रष्टाचार, पैशाचे वाढलेले महत्व व लोकांचा अप्पलपोटेपणा यावर फोडता कामा नये.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलासाठींचे आरक्षण ३३ टक्क्यांवरून ५० टक्क्यांवर नेण्याच्या सरकारी निर्णयाकडे आपण सकारात्मक बघुया असे त्यांनी सुचवले. त्यातून फार क्रांतिकारी बदल होणारे नाहीत. कारण प्रस्थापित पुरूष-प्रधान राजकीय व्यवस्था, आपल्या शब्दाबाहेर जाणार नाहीत अशाच आपल्याच जवळच्या नातेवाईकांना (बायको,आई) तिकीटे मिळतील हे बघणार हे उघड आहे. पण स्त्री ही कितीही म्हटले तरी कोणा ना कोणाची आई असते. पुरूषापेक्षा तिला घराचे महत्त्व अधिक पटलेले असते. त्यामुळे घनकचरा, सांडपाण्याचा निचरा होणे, स्वच्छ पाणी मिळणे, हवेशीर, आरोग्यदायी सर्वांना परवडतील अशी घरे मिळणे, हवा दूषित होणार नाही अशी वाहतूक व्यवस्था असणे यासाऱ्यांकडे महिला उमेदवार अधिक सजगपणे बघतील असा त्यांना विश्वास वाटतो.

सर्व तरूण होतकरू, समाजासाठी काहीतरी करण्यासाठी धडपडणाऱ्या व त्याचाच एक भाग म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सहभागी झालेल्या, निवडून आलेल्या व लढू पहाणाऱ्या सर्वाना वसुधाताईनी शुभेच्छा दिल्या आहेत !

**मुलाखतकार व लेखन**
संजीव चांदोरकर
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

❒❒❒

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये (ना.स्था.स्व.सं.) महिलांना ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे पहिल्यांदा हक्काच्या ३३ टक्के जागा मिळाल्या, हे आपल्या सर्वांना माहित आहे. आता तर हे आरक्षण वाढून ५० टक्के झाले आहे. म्हटलं तर अर्ध राज्य महिलांच्या कवेत आलं आहे. ज्या घटना दुरूस्तीमुळे पुरूषी राजकारणामध्ये महिलांसाठी प्रथमतः ३३ टक्के जागा आरक्षित करण्यात आल्या ती ७४वी घटनादुरूस्ती केवळ या ३३ टक्के आरक्षणा इतपत मर्यादित नाही हे आपण समजून घेतले पाहिजे.

मुळातंच ही ७४ वी घटना दुरूस्ती काय आहे, तिचं उद्दिष्ट काय आहे, यातून अपेक्षित बदल काय होते आणि एकूणच भारतीय लोकशाहीत या घटना दुरूस्तीचे काय स्थान आहे हे आपल्यासारख्या शहरी कारभाराची धुरा सांभाळणाऱ्या कारभारणींना आवर्जून माहित असले पाहिजे, या जाणिवेतून '७४ व्या घटनादुरूस्तीचे प्रगती पुस्तक' या सदराची रचना केली आहे. इथे 'प्रगती पुस्तक' हा सूचक शब्द एवढ्यासाठी की ७४ व्या घटनादुरूस्तीमध्ये अपेक्षित काय होते आणि सद्यःस्थितीत काय होत आहे याचा तुमच्या समोर ताळेबंद आणण्याचा  आमचा प्रयत्न असणार आहे.

वर्ष १९९२ मध्ये ७४ वी घटनादुरूस्ती संमत झाली. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेत या घटना दुरूस्तीचे अनन्य साधारण महत्व आहे. शहरी भागातील स्थानिक लोकप्रशासनाला अधिकार प्राप्त करून देण्यामध्ये, त्यांना स्वायतत्ता देण्यामध्ये ही घटनादुरूस्ती हा सर्वात पहिला व महत्वाचा टप्पा आहे. प्रथमच ना.स्था.स्व.सं.ना घटनात्मक दर्जा मिळाला. यापूर्वी सर्व स्थानिक प्रशासन संस्था या राज्यशासनाच्या 'एजन्सी' म्हणून काम करत होत्या. त्यांचे सर्व अधिकार, प्रशासन कसे चालवावे त्या संबंधीचे नियम राज्य शासन ठरवित होते. ७४  व्या घटना दुरूस्तीमुळे या राज्यस्तरावरील अधिकारांचे, नियंत्रणांचे स्थानिक प्रशासन स्तरावर विकेंद्रीकरण झाले. पालिकांची रचना, कालावधी, महिलांसाठी आरक्षण, अनुसूचित जाती व जमातींसाठी आरक्षण, अध्यक्षपदाचे आरक्षण, राज्य निवडणूक आयोग,राज्य वित्त आयोग, प्रभाग समिती रचना, महानगर व जिल्हा नियोजन समित्यांची नेमणूक या सर्व घटनेतील तरतूदी सर्व जिल्ह्यांना लागू केल्या गेल्या व यामध्ये सारखेपणा आणला.

महाराष्ट्र राज्यामध्ये १९९४ साली घटनादुरूस्तीचा कायदा संमत झाला. त्यानुसार ना.स्था.स्व.सं.च्या कायद्यांमध्ये बदल करण्यात आले. राज्यामध्ये ना.स्था.स्व.सं. चा कारभार चार कायद्यांनुसार चालतो. मुंबई महानगरासाठी स्वतंत्र 'मुंबई महानगरपालिका अधिनियम (कायदा) १८८८, नागपूर शहरासाठी स्वतंत्र कायदा, 'नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८. या दोन महानगरपालिका वगळता अन्य महानगरपालिकांकरिता 'मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९. व नगरपालिकांकरिता 'नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक वसाहती अधिनियम १९६५' असे चार कायदे महाराष्ट्रात आहेत. आज महाराष्ट्रात एकूण २५२ ना.स्था.स्व.सं. असून यामध्ये २६ महानगरपालिका १४६ नगरपरिषदा आणि ७ नगरपंचायती आहेत.

७४ व्या घटना दुरूस्तीमध्ये ना.स्था.स्व.सं. ची काही ठराविक निकषांवर म्हणजे लोकसंख्या, लोकसंख्येची घनता, उत्पन्न, अकृषिक रोजगाराचे प्रमाण, आर्थिक वैशिष्ट्ये आधारित वर्गीकरण सुचवले आहे. त्यानुसार मोठ्या नागरी भागासाठी जिथे लोकसंख्या तीन लाखाच्या वर आहे ती शहरे ही महानगरपालिका, तसेच लहान नागरी भागासाठी जिथे लोकसंख्येच्ये प्रमाण हे तीन लाखापेक्षा कमी मात्र २५ हजारापेक्षा जास्त आहे अशा शहरांसाठी 'नगरपरिषद' घोषित करण्याचे निकष निश्चित करण्यात आले. तसेच असा भाग जिथे शहरीकरण होत आहे, जो कोणत्याही अ वर्ग नगरपरिषदेच्या किंवा महानगरपालिकेच्या २५ कि.मी च्या अंतरावर आहे, लोकसंख्या १० हजारापेक्षा जास्त मात्र २५ हजारापेक्षा कमी आहे आणि अकृषिक रोजगाराचे प्रमाण २५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे, अशा नागरी भागाला 'नगरपंचायत' घोषित करण्याचा निकष ठरवला गेला. एकूणच स्था.स्व.सं.ची रचना देशपातळीवर एकसमान करण्याचा प्रयत्न या घटनादुरूस्तीच्या माध्यमातून झाला. यापुढेही जाऊन राज्य शासनाने ना.स्था.स्व.सं.च्या कायद्यांमध्ये नगरपरिषदांच्या 'अ', 'ब' व 'क' वर्गीकरणाचे लोकसंख्येचे निकष निश्चित केलेले आहेत; मात्र महानगरपालिकेच्या वर्गीकरणाबाबत कायद्यांमध्ये तरतूद नाही. परंतु वर्ष २००६ च्या शासन परिपत्रकाद्वारे (जी आर) राज्यातील  २६ महानगरपालिकांचे 'अ', 'ब' ,'क' व 'ड' या चार वर्गांमध्ये वर्गीकरण केलेले दिसते. हे वर्गीकरण त्या महानगरपालिकेची लोकसंख्या, क्षेत्रफळ, उत्पन्न व उत्पन्नाची साधनं आणि पायाभूत सुविधा यांच्या आधारे केलेले आहे. 'अ' वर्गामध्ये केवळ मुंबई मनपा, 'ब' वर्गामध्ये पुणे व नागपूर या दोन मनपा, 'क' वर्गामध्ये पिंपरी चिंचवड, ठाणे, नाशिक व नवी मुंबई या चार मनपा आणि उर्वरित १९ मनपा ज्यामध्ये सोलापूर, कोल्हापूर, सांगली-मिरज-कुपवाड, औरंगाबाद, जळगाव, नांदेड-वाघाळा, धुळे, मालेगाव, परभणी, लातूर, चंद्रपूर, अकोला, अमरावती, अहमदनगर, कल्याण-डोबिंवली, मिरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर आणि वसई-विरार या मनपांचा समावेश आहे. केंद्र शासन व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या निधीचे वाटप हे महानगरपालिकांच्या या वर्गवारीनुसार ठरत असते.

ना.स्था.स्व.सं.च्या रचनेप्रमाणेच त्यांच्या जबाबदाऱ्या व अधिकारांमध्येही महत्वाचे बदल ७४ व्या घटना दुरूस्तीमुळे झालेत. चारही महानगरपालिका कायद्यांमध्ये त्यांच्या जबाबदाऱ्या, अधिकार व कार्ये निश्चित केलेली आहेत. 'अनिवार्य' व 'ऐच्छिक' अशा दोन वर्गात त्यांची विभागणी केलेली आहे. 'अनिवार्य' जबाबदाऱ्यांसाठी पालिकेला निधीची तरतूद करणे बंधनकारक असते तर 'ऐच्छिक' जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी निधीची तरतूद करणे हे स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या इच्छेवर अवलंबून असते. ही घटना दुरूस्ती येण्याआधीपासून सामान्यतः पालिकांच्या कामांमध्ये पालिकेच्या हद्दीतील नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा पुरवणे; यामध्ये दिवाबत्ती करणे, पाणी पुरवठा, वीजपुरवठा, स्वच्छता, सांडपाण्यासाठी गटार नाली व्यवस्था, कचरा उचलण्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा पुरवणे, प्राथमिक शिक्षण सुविधा पुरवणे, जन्म-मृत्यूची नोंद करणे यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे पायाभूत सुविधा उभारणीमध्ये गटारे, नाली, रस्ते, पूल, पालिका इस्पितळे, प्राथमिक शाळा, शासकीय कर्मचाऱ्यांसाठी वसाहती, मैदानांची देखभाल याचा समावेश होता. सामाजिक कल्याण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक भवन, समाज मंदिर, अपंग, वृध्द, निराधार व्यक्तींसाठी इमारतीची उभारणी व देखभाल याचा समावेश होता. ७४ व्या घटना दुरूस्तीने यामध्ये १८ कामाची एक यादी '- '१२ वी अनुसूची' या सर्व ना.स्था.स्व.सं.च्या आधीच्या कामांमध्ये जोडली.

आपल्या राज्यातील पालिकांच्या संदर्भात सांगायचे झाले तर या १८ पैकी १० कामे पालिकांच्या कायद्यांमध्ये या पूर्वीच होती. उर्वरित आठ कामांची मात्र राज्य शासनाच्या 'इच्छेनुसार' काहींचा 'अनिवार्य' तर काहींचा 'ऐच्छिक' वर्गामध्ये समावेश करण्यात आला. खरं तर या १८ कामांचे 'अनिवार्य' व 'ऐच्छिक' वर्गांमध्ये केलेली विभागणी राज्य शासनाची या विषयीची प्राथमिकता व भूमिका सूचित करते ! इथे आपण महानगरपालिकेच्या संदर्भातील ही जबाबदाऱ्यांचे प्राधान्य समजून घेऊ.

शहराचे नियोजन व विकास आराखडा तयार करणे, बांधकाम व जमिनीच्या वापरावरील नियंत्रण, सामाजिक व आर्थिक नियोजन, रस्ते व पूलांचे बांधकाम, घरगुती, औद्योगिक वापरासाठी व व्यापारासाठी पाणीपुरवठा, सार्वजनिक आरोग्य सुविधा व घन कचरा विस्थापन व्यवस्था, अग्निशमन सेवा, शहरी वनीकरण व निसर्गाचे जतन, संवर्धन तसेच दफनभूमीसाठी जागा, विद्युत दाहिनी उपलब्ध करणे महत्वाची सांख्यिकी व जन्म-मृत्यू नोंदणी व्यवस्था, रस्त्यांवरील दिवाबत्ती, सार्वजनिक सोयी-सुविधा आणि कत्तलखानांवरील नियंत्रण या सर्व जबाबदाऱ्या मनपांना अनिवार्य केल्या म्हणजे यासाठी मनपाच्या वार्षिक अंदाजपत्रकात तरतूद करणे बंधनकारक आहे. मात्र आर्थिकदृष्ट्या, दुर्बल, अपंग, मानसिक रूग्ण यांचे हित जपणे, झोपडपट्टी सुधारणा, व श्रेणीवाढ, शहरी दारिद्र्य निर्मूलन, सांस्कृतिक, शैक्षणिक दृष्ट्या महत्वाच्या प्रेक्षणीय वास्तूंचे / घटकांचे जतन व पुरस्कार करणे, प्राण्यांचे संरक्षण, जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पार्किंग व्यवस्था या सर्व कामांना 'ऐच्छिक' यादीमध्ये टाकले आहे.

समाजातील ज्या घटकांना सर्वात जास्त सर्वार्थाने 'सपोर्ट' ची आवश्यकता आहे, अशांसाठी स्थानिक पातळीवर सोयी-सुविधा पुरविणे झोपडपट्टी सुधारणा करणे 'ऐच्छिक' आहे ! म्हणजेच स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या इच्छेवर अवलंबून आहे. वस्तुस्थिती ही आहे की केंद्र शासन व राज्यशासनाकडून या घटकांसाठी विविध योजनांमधून निधी मिळत असताना स्था.स्व.सं. कडून स्वतःच्या उत्पन्नामधून यावर खर्च करण्याची फारशी मानसिकताही नसते. मात्र वर्ष २००६ मध्ये जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान योजनेच्या माध्यमातून सर्व महानगरपालिकांना शहरी गरीबांसाठी मूलभूत सोयी-सुविधांसाठी मनपाच्या उत्पन्नापैकी ठराविक निधी उपलब्ध करणे बंधनकारक केले गेले आहे. असे असले तरीही अटीची पूर्तता, प्रत्यक्ष अंमलबजावणी स्था.स्व.सं.नी कागदोपत्री केलेली दिसते.

अनिवार्य जबाबदाऱ्यांच्या बाबतीतही चित्र वेगळे नाही. शहराचे आर्थिक व सामाजिक नियोजन, शहरनियोजन व विकास आराखडा तयार करणे या महत्वाच्या जबाबदाऱ्या मनपाकडे सोपवल्या असल्या तरीही त्यासाठी आवश्यक अधिकारी, कर्मचारी तसेच आर्थिक सहाय्य पुरेसे दिलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. ही प्रक्रिया लोकसहभागातून व्हावी तसेच ती पारदर्शी असावी असे अपेक्षित असले तरीही 'नियोजन' प्रक्रिया ही प्रशासकीय व्यवस्थेचा एक भाग म्हणून तसेच राजकीय हितसंबंधांमध्ये गुंतलेली प्रक्रिया दिसते. राजकीय हितसंबंधापलिकडे जाऊन मतदारसंघाच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच 'स्थानिक लोकशाहीची' मुळे घट्ट करण्यामध्ये शहरी कारभारणींचा सिंहाचा वाटा असू शकतो. एक 'अंकुश शक्ती' म्हणून मनपा प्रशासनाने करावयाची कामे, जबाबदाऱ्या यांच्यावर देखरेख ठेवू शकतात. त्याचबरोबर सर्व आर्थिक स्तरातील, जातीचे भेद न पाहता माझ्या मतदारसंघातील सर्वांना मनपाच्या सर्व सोयी-सुविधा मिळण्यासाठी त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची तसेच या मार्गात येणाऱ्या अडचणी दूर करण्याची संधी ७४ वी घटना दुरूस्तीमध्ये दिसते.

त्यामुळे ७४ व्या घटना दुरूस्तीमधील प्रत्येक तरतूद माझा मतदारसंघ बळकट करण्याचा 'अजेन्डा' असू शकतो असा विचार शहरातील कारभारणींना नक्की करायला हवा.

**- स्मिता वायंगणकर**
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

❒❒❒

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका ११९८ मध्ये जन्माला आली. सांगली व मिरज या दोन्ही शहरांना मोठा नागरी इतिहास आहे. ह्या दोन्ही ठिकाणांचा मराठ्यांच्या इतिहासात उल्लेख आहेच; इतिहासकारांच्या मते १०२४ सनापासून सांगली अस्तित्वात आहे. कृष्णेचे पाणी, सुपीक जमीन यामुळे येथे वस्ती होतीच. त्याला शहरी परिमाण लाभले ते चिंतामणराव पटवर्धनांनी जेव्हा सांगलीला संस्थानाची राजधानी म्हणून निवडले तेव्हा. १७६८ साली जवळच्या हरिपूरहून कमी लोकवस्ती असलेले सांगली गाव १८०१ साली चिंतामणरावांनी बांधलेल्या अनेक संस्था व सोयी सुविधांतून आर्थिक दृष्ट्या संपन्न, सुसंस्कृत, गजबजते शहर म्हणून आकार घेऊ लागले. स्थानिक लोकशाहीची बीजेदेखील सांगलीत याच काळात रोवली गेली. सांगलीची राजधानी म्हणून भरभराट होत असताना शेजारील मिरज वाढत होते ते रेल्वे व मिशनऱ्यांच्या आरोग्यसेवांमुळे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर साराच पश्चिम महाराष्ट्र, जलसंधारण, त्यातून उत्पन्न होणारी साखर, द्राक्ष यासारखी नगदी पिके व या सर्वास खतपाणी घालणारे सहकारी संस्थांचे जाळे यातून राजकीय आर्थिक दृष्टीने सुधारक म्हणून पुढे आला. सांगली हे या पुढारलेपणाचे एक केंद्र होते. या शहराच्या आसपास ३० च्या वर सहकारी साखर कारखाने आहेत. हळद, इतर मसाले यांची मोठी बाजारपेठ सांगलीत आहे. शिवाय सांगली-मिरजेत औद्योगिक कारखानदारीची भक्कम मुळे आहेत. आसपासच्या या सुबत्तेतून सांगली हे शिक्षण-आरोग्य सेवांचे केंद्र बनले. या दोन भिन्न सामाजिक आर्थिक संस्कृतीच्या शहरांसमवेत कुपवाड ही छोटी नगरपालिका जोडून सांगली-मिरज कुपवाड महानगरपालिका जन्माला आले.

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकाचे सध्याचे क्षेत्रफळ ११८.१८ चौ. किमी असून २०११ च्या जनगणनेनुसार या शहराची लोकसंख्या ५,०२,६९७ आहे. लोकसंख्येच्या वाढीचा वार्षिक दर हा साधारण २ टक्के आहे. शहराची जवळजवळ १५ टक्के जनता झोपडवस्त्यांमध्ये राहते. या शिवाय शहरांच्या अनेक विभागात गुंठेवारी आहे. जुनी गावे, गुंठेवाऱ्या, झोपड्या व नवीन विकास कामे या सर्व ठिकाणाच्या सोयी-सुविधांचे प्रश्न वेगवेगळे आहेत.

वाढती लोकसंख्या व क्षेत्र, या सर्वांना अपुरे पडणारे पाणी व स्वच्छता व्यवस्था, पुणे-मुंबईचे वाढते आकर्षण व सहकाराचा अर्थकारणाचा ढासळता पाया यामुळे अर्थव्यवस्थेला बसलेला लगाम, अनियोजित बांधकाम व कृष्णा नदीचे वाढते प्रदूषण ही सर्व समिकुमच्या पुढील आव्हाने आहेत.

**सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका**

मनपामध्ये ४ झोन (विभाग) असून ७४ वॉर्ड (मनपा मतदारसंघ) आहेत; विभाग क्र. १ मध्ये वॉर्ड संख्या २०, विभाग २ मध्ये १९, विभाग ३ मध्ये १५ तर विभाग ५ मध्ये २० वॉर्ड संख्या आहे.

या सर्व विभागांमध्ये मुलभूत सुविधांची स्थिती बदलती आहे. जसे विभाग १ व २ मध्ये काही भागांमध्ये मलनिसाःरण व सांडपाणी व्यवस्था आहे, विभाग ३ मध्ये ती अजिबात नाही. नदीकाठी असल्याने पाणी पुरवठ्याची परिस्थिती बिकट नाही परंतु नळाद्वारे केवळ ६३ एमएलडी. पाणी पुरवले जाते, उर्वरीत पाणीपुरवठा व्यवस्था विहीरी व बोरवेल द्वारा केला जातो; खास करून गुंठेवाऱ्यामध्ये या व्यवस्थांचे प्रमाण अधिक आहे. शहराच्या जवळपास ८७ टक्के जनतेला शौचालये उपलब्ध आहेत परंतु त्यांची संख्या कमी असल्याने जवळपास ५३ ठिकाणी खुल्या जागेत शौचास जावे लागते. एकूण सांडपाण्यापैकी अर्ध्याच्यावर ५६टक्के पाणी कुठलीही प्रक्रिया न करता नाल्यात व पर्यायाने नदीत सोडले जाते. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे काम खाजगी कंत्राटदाराला दिले आहे. एकूण तयार होणाऱ्या १९५ टक्के कचऱ्यापैकी ९ टक्के गोळा केला जातो. पण त्यातला २० टक्के कचरा वेगळा केला जातो. हा २० टक्के म्हणजे बहुतांश बाजाराच्या ठिकाणचा हा कचरा आहे. एकूणच कचरा सामिकुमपा मध्ये स्वच्छतेची परिस्थिती गंभीर आहे. महाराष्ट्रात केलेल्या सर्व शहरांच्या सर्वेक्षणांत सांगलीचा नंबर ४२३ पैकी १४९ वा होता व एकूण स्थितीला लाल म्हणजेच चिंताजनक परिस्थितीचा सांकेतिक रंग ही दिला होता.

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकामध्ये बहुतांश मध्यमवर्गीय व गरीब वस्त्या आहेत. ८५ टक्के लोक साक्षर आहेत व सरासरी वार्षिक उत्पन्न दरडोई रू.२६,६९१ आहे. जवळपास २५ हजार लोक येऊन जाऊन असतात असा अंदाज आहे. शहराची बाजारपेठ मोठी आहे; त्यामुळे अनेक उद्योग, व्यापारी जरी जवळील हरिपूरमध्ये गोदामे, उद्योग उघडत असले तरी मनपाची आवक चांगली आहे. प्रामुख्याने मालमत्ता कर हेच उत्पन्नाचे प्रमुख साधन असलेल्या सामिकुमपाचे एकूण उत्पन्न साधारण ८२ कोटी रूपयांच्या घरात आहे. यापैकी जवळपास ३८-४०टक्के बजेट हे २२५० कर्मचारी यांचा पगार व इतर आस्थापना वर खर्च होतो. मनपाच्या सर्वात मुख्य शासकीय अधिकारी म्हणजे आयुक्त यांची नेमणुक राज्य सरकारतर्फे होते.

नवीन स्थापन झालेली, सुधारक व संपन्न पुणे विभागातील मनपा यामुळे सामिकुमपा ही शहरी सुधारणाबाबत अग्रेसर राहिली आहे. सोयी-सुविधांबाबत खाजगी भांडवलाशी भागीदारी यासाठी वर्ष २००० मध्ये USAID च्या प्रकल्प राबवण्यात आला. आता देखील Eco-City प्रकल्प, E-Governance City Sanitation मनपाने हाती घेतले आहेत IHSDP (एकात्मिक गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रम) या केंद्र सरकारच्या योजनेसाठी सांगली शहराची पथदर्शी प्रकल्प म्हणून निवड करण्यात आली असून सर्वाधिक म्हणजे ९४.० कोटीचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. या सर्व प्रकल्पांद्वारे सांगली मनपा शहरा बाहेरील अनेक व्यक्तींशी (खास करून तज्ञ कन्सलटन्ट ) संबंध जोडू पहात आहे. एकूण कारभाराला आधुनिक रूप येत आहे.

### वेध राजसत्तेचा

सांगली शहराच्या आर्थिक व पर्यायाने राजकीय नाड्या या भोवतालच्या प्रदेशाशी निगडीत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते जवळपास १९९० पर्यंत हे राजकारण त्यामुळे सहकार, साखर कारखाने व इतर संस्था याभोवती गुंतलेले होते. सहाजिकच कॉंग्रेस पक्षच येथे प्रदेशात व शहरांत तेजीत होता. यामध्ये बदल झाला तो श्री वसंतदादा पाटील यांच्या निधनाने व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थापनेने. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सत्ताकेंद्र ग्रामीण भागात सहकाराचे व शहरामध्ये जमीनीशी निगडीत आहे. यामुळे सांगली शहराचे सध्याचे राजकारण हे कमालीचे स्पर्धात्मक झाले आहे. काही वर्षापासून शहरांमध्ये पुणे पॅटर्न ज्यामध्ये अनेक पक्ष एकत्र येऊन मनपामध्ये राज्य करत आहेत. पर्यायाने स्थानिक राजकारण अस्थिर आहे.

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका राजकारणाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यावरील राजस्तरीय राजकारणाचा प्रभाव. सांगली प्रदेशातील अनेक नेते राज्यस्तरावर मान्यवर आहेत, शहराचे स्वतःचे असे नेतृत्व फारसे नाही. राज्यात येणारे अनेक प्रकल्प शहरात कसे आणता येतील यावर या राजकारणाचा भर आहे. त्यामुळेच अनेकदा मनपाचे आयुक्त हे अनुभवी, आय.ए.एस. श्रेणीतील असतात, परंतु त्यांचा कार्यकाल देखील कमी असतो. मनपाचा सुधारणांभिमुख रोख देखील यामुळेच आहे.

आयुक्तांच्या हाताखालील यंत्रणेची मुळे मात्र पूर्णपणे स्थानिक आहेत. यामुळेच सामिकुमपाच्या राजकारणाचा एक वेगळाच पोत आहे. USAID च्या प्रकल्पातील पाण्याच्या खाजगी भागीदारीचा प्रकल्प विरोधामुळे संपुष्टात आला पण त्यातीलच झोपडवस्त्यांना शौचालये पुरवठ्याचा प्रकल्प अतिशय यशस्वी झाला. IHSDP प्रकल्प देखील अंमलबजावणीत मागे पडतो आहे, तो यामुळेच.

स्थानिक कारभाराचे, राजकारणाचे अवकाश अतिशय संकुचित असल्यामुळे हा राज्यस्तरीय व स्थानिक राजकारणाचा संघर्ष हा 'प्रस्ताव विरोध' अशाच स्वरूपाचा आहे. हे अवकाश वाढले तर मात्र त्याला नवीन निर्मितीचे घुमारे फुटू शकतील.

**लेखन**
डॉ.प्रा.अमिता भिडे
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

❒❒❒

## राजकारण आणि बॅनर

सध्या राजकारण म्हटलं की काही गोष्टी त्याच्याशी सरळ जोडल्या जातात, त्या म्हणजे पैसे, वरिष्ठांशी ओळखी, सोबत असणारा 'पोरांचा थवा' आणि जाहिरातबाजी. ध्येय, उद्दिष्ट, कार्यक्रम याबाबतचा विचार हा दुय्यम असतो. आपापल्या शक्यतेनुसार, ऐपतीनुसार कमीअधिक प्रमाणात यातलं काहीतरी राजकारणात असणारे छोटे-मोठे नेते, कार्यकर्ते करतचं असतात किंवा त्यांना करावं लागत. यातल्या जाहिरातबाजीचं ढळढळीत दिसणारं उदाहरण म्हणजे 'बॅनरबाजी.'

माझ्या ओळखीच्या एक बाई एका राजकीय पक्षात सभासद झाल्या नंतर काही दिवसांत पदाधिकारी झाल्या. त्या जेथे रहात होत्या तिथल्या दोघी जणी त्यांना म्हणाल्या, 'ताई, आपण तुमच्या अभिनंदनाचा बॅनर लावू'. ताई चालेल म्हणाल्या. दुसऱ्या दिवशी माझ्या मैत्रिणीने तिचा फोटो आणून त्या दोघींना दिला. त्या म्हणाल्या,' 'आमचे फोटो आमच्याकडे आहेत'. बॅनरचा मजकूर आणि बावीस रूपये स्वेअर फूट प्रमाणे बॅनरवाल्याचे पैसे द्यायचे आहेत. महानगरपालिकेच्या परवानगीचे वेगळे' माझी मैत्रिण पुरती गोंधळली. म्हणजे माझे अभिनंदन करणारे बॅनर माझे मीच लावायचे ?

तिचा गोंधळ स्वाभाविक होता. बॅनर लावणारे लोक सोडून इतरांच्या बॅनर लावण्याबाबत विविध कल्पना असतात. कोणाला वाटते पक्षाचा एखादा फंड असेल, काही लोकं एकत्र येऊन पैसे काढून बॅनर लावत असतील, काहींना वाटतं 'प्रोटोकॉल' असेल. 'बडे नेते' भरपूर पैसे खर्च करून बॅनर लावत असतील इत्यादी....

बॅनर लावणारे हे सर्वजण कोण असतात आणि कसा विचार करतात ?.. हे समजून घेतलं तर त्या छोट्या विभागातचं निवडणूकीचं राजकारण काही प्रमाणात आपल्याला नक्कीच माहित होतं. या बॅनरवर ज्यांचे फोटो तळात ओळीमध्ये दिसतात ते त्या विभागातले कार्यरत असणारे छोटे मोठे पदाधिकारी असतात. मध्ये जे मोठे फोटो असतात ते सर्वात महत्वाचे. या कार्यकर्त्यांनी पैसे टाकलेले असतात (सहाजिकच यात महिलांची संख्या नगण्य असते) आणि बॅनरची कल्पना त्यांची असते. त्या वरची जी फोटोंची ओळ असते ते या मधल्या फोटोवाल्यांचे स्थानिक नेते असतात. बरेचदा या स्थानिक नेत्यांचे फोटो जरी वर असले तरी आकाराने छोटे असतात. राष्ट्रीय पक्ष असला तर एखादा राष्ट्रीय नेता सोडून छोटे बरेच फोटो असतात.

सध्या कोणत्याही राजकीय पक्षाचे बॅनर आपण पाहिले तर काही विषय सर्वांचे समान आढळतात. उदा. वाढदिवसाच्या शुभेच्छा, विविध सणांच्या शुभेच्छा, पक्षाचा एखादा वरिष्ठ नेता त्या परिसरात येणार असेल तर त्याचे स्वागत, पक्षामध्ये एखाद्याला 'पद' मिळाले तर त्याचे स्वागत, दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा आणि नंतर त्यांचे अभिनंदन... बहुतांश मजकूर असेच असतात. ते वाचल्यावर जणू असे वाटावे की सर्व राजकीय पक्षांचा अजेंडा एकच तर आहे. मी या वॉर्डात आहे हे दाखविण्याची ती स्पर्धाच असते. फार क्वचित एखादा कार्यक्रम, योजना अथवा धोरण सांगणारा बॅनर असतो. कशा करता बोर्ड लावलाय यापेक्षा पक्षाचा 'झेंडा' आहे आणि पक्षातले बरेचसे चेहरे त्याच्यावर आहेत इतकचं प्रामुख्याने पाहिलं जातं.

बॅनरच्या फोटोंची रचनाही फार महत्वाची असते. फोटोवरून कोण कोणाला नेता मानतो आणि पक्षांतर्गत कोणत्या गटात आहे तेही बॅनर लावणाऱ्याला जाहिर करता येते. त्यातून सरळसोट विचार करणाऱ्या कार्यकर्त्याची गोची सुध्दा होते. उदा. नुकताच गणेश भक्तांचे स्वागत करणारा बॅनर एका कार्यकत्याने लावला. त्याने विचार केला, स्थानिक महत्त्वाच्या नेत्यांचे फोटो आपण मोठे टाकू. त्यामुळे मधल्या रांगेत त्याने या नेत्यांना ठेवले आणि वरच्या छोट्या फोटोंच्या पण राष्ट्रीय नेत्यांच्या ओळीमध्ये त्याने त्यामानाने कमी महत्त्वाच्या लोकांना टाकले. त्याला वाटले आपण योग्य विचार केला. पण 'प्रोटोकॉल' च्या नावाने त्याला वरिष्ठांची बोलणी खावी लागली.

काही वेळा राष्ट्रीय पक्षामध्ये आणखी एक पेच असतो. एखादा कार्यकर्ता महाराष्ट्र राज्यातल्याच नेत्यांचे फोटो टाकतो. लगेच त्याचा एखादा स्थानिक विरोधक (तो बहुतेक वेळा असतोच) अगदी दिल्लीतल्या पक्ष पदाधिकाऱ्यांना त्या बॅनरचा फोटो पाठवतो. याबाबत दिल्लीतून नेहमीच विचारणा होत असे नाही; पण निवडणूक वगैरे असली की होतेही ! अनेकदा ही सगळी 'काळजी' घेण्याची जबाबदारी 'मोठ्या' नेत्यांवर, कार्यकर्त्यांवर नसते. तो झालेला असतो. त्या भागातल्या मान्यता प्राप्त असतो. 'त्याचे ' म्हणून कार्यकर्ते तयार झालेले असतात. या मोठ्या नेत्यांचा बॅनर लावण्यात एक मोठेपणा निर्माण झालेला असतो. काहीवेळा एखादा नवखा पण पैसेवाला कार्यकर्ता असला तर तो अनेक गोष्टी करू शकतो.

एक बॅनर तयार करताना अशा तऱ्हेने कधी एकट्याने, कधी सामुदायिकपणे, कधी स्थानिक नेत्याकडून मदत घेऊन पैसे उभारणे, तळाच्या कार्यकर्त्यांना न दुखावता नेमके कोणते फोटो असावेत हे ठरविणे, बॅनर छापणे, तो योग्य ठिकाणी जागा बघून लावणे, त्या करिता महानगरपालिकेतल्या अधिकाऱ्याला पटवणे (क्वचित एखादा 'कायदा' पाळून बॅनर लावणारा असला तर पैसे भरून पालिकेची परवानगी घेतो) यात खूप वेळ आणि शक्ति जाते ... अर्थात प्रसिध्दी मिळते. 'पैसेवाले' पक्ष कार्यकर्त्यांना जेवणावळी घालणे, मोठे हॉल घेऊन त्यात कोणत्याही निमित्ताने लावणीचे, भजनाचे किंवा ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम घेणे; पर्स, छत्र्या, घड्याळे, साड्या,

शर्ट इत्यादी गोष्टींचे वाटप करणे, वर्तमानपत्रात 'फुल पेज' जाहिराती देणे, अशी माध्यमे लोकांमध्ये आपले नाव पोहोचविण्याकरीता वापरू शकतात, वापरतात. याकरिता लाखोंनी रूपये खर्च करतात. अशा वेळी गरीब कार्यकर्त्यांना सगळ्यात सोपे आणि अवाक्यात असलेले, स्वतःच्या प्रचाराचे माध्यम म्हणजे 'बॅनर बांधणे' असते, हे विसरून चालणार नाही.

समाजातील बहुसंख्य लोक या 'बॅनर कम्युनिटीशी' संबंधित नसतात. सहाजिक त्या भोवतीच्या राजकारणाचा त्यांना गंधही नसतो. शिक्षित, मध्यम वर्गीय, बुध्दीजीवी माणसं या बॅनर्सकडे तुच्छतेने बघत असतात. बॅनरवर त्यांच्या फोटोंना लावलेल्या विशेषणांना उदा. दादा, भाई, नाना इत्यादीवर हसत असतात, 'शहर किती घाण झालयं', रोज उठून यांचेचं चेहरे बघायची शिक्षा असते' अशा त्रासलेल्या प्रतिक्रिया असतात. त्या फोटो मधले हसरे चेहरे, त्यातले गॉगल, जाकिट यांची टिंगल करतात. तर काही लोक विचार करतात की सहाजिक आहे हे राजकरण आहे, असं व्हायचचं. तर काही जणांना आपलाही फोटो असा झळकला पाहिजे अशी इच्छा असते. त्या करता कोणता पक्ष बरा याचा शोधही ते घेत असतात. मला तर कित्येकदा असं वाटतं की हे बॅनर क्वचित प्रसंगी सामान्य लोकांकरिता असतात. बहुतेक वेळा स्वपक्षातल्या आणि अन्य पक्षातल्या स्थानिक 'बॅनर कम्युनिटी' करताचं ते असतात. ज्यांना स्थानिक राजकारणात कोण कुठे आहे, सध्या कशावर लक्ष ठेऊन आहे हे समजणे गरजेचे असते.

शिक्षित थरातले, आधुनिक विचारांचे, लोक राजकारणात गेले की त्यांना प्रचारातला हा बटबटीतपणा पटत नाही. माझी एक मैत्रिण स्थानिक राजकारणात महत्वाच्या पदावर गेली. तिने सांगितले की 'लोकांच्या दृष्टीने पाहिले तर सगळे फोटो सारखेच आहेत. तुम्ही बॅनरवर माझ नाव लिहा फोटो नको.' पक्षातल्या एका महत्वाच्या कार्यक्रमात तिच्या बरोबर असणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांचे फोटो होते, तिचे फक्त नाव होते. आणि सर्व पदाधिकाऱ्यांमध्ये नेमकी तिच महिला होती. त्याचा परिणाम असा झाला की ती महिला होती म्हणून तिला डावलले अशी चर्चा महिलांमध्ये सुरू झाली. शिवाय काहीजणी म्हणू लागल्या की 'तुम्ही आमच्या प्रमुख आहात. तुम्ही जर फोटो लावला नाही तर आम्हालाही फोटो लावणं कठीण वाटतं. फोटो न लावण्यामागची तिची भूमिका तिने पक्षातल्या लोकांना सांगण्याचा प्रयत्न केला. तेव्हा 'बरोबर आहे तुमचं. पण समोरचे सगळे पक्ष तेच करताहेत. मग त्यांच्या मध्ये आपण कुठेच नाही असा मॅसेज लोकांना जाईल' अशी प्रतिक्रिया तिच्या पक्षातल्या लोकांनी दिली.

पुढील काळात जसजसा शिक्षित थर अधिक विस्तारत जाईल, आधुनिक मूल्य मानणारा समाज वाढेल, सरंजामी पकड आणखी कमी होऊन समानतेचे मूल्य प्रत्यक्षात आणणे अधिक सोपे होईल तेव्हा कदाचित दादा, भाई, ताई, वहिनी, नाना, पप्पा, अक्का, जाणता राजा... असली विशेषणे - जी प्रेमापेक्षा दबदबा निर्माण करण्याकरिता राजकारणात सध्या अधिक वापरली जातात ती लावून घेणे कमी होईल. नावातल्या दबदब्यापेक्षा विषयपत्रिका, ध्येय-धोरणे इत्यादी मागे पडलेल्या गोष्टींना कदाचित अधिक महत्त्व येईल. सद्यस्थितीत मात्र या मूलव्यवस्थेशी कधी जुळवून घेणे, कधी झगडणे अशारितीने जावे लागेल. तत्त्वनिष्ठ, लोकाभिमुख राजकारण करणाऱ्यांनाही याला सामोरे जाणे भाग पडते आहे.

तातडीने बॅनरचा सुळसळाट कमी करण्याकरिता दोन गोष्टी करता येतील असे मला वाटते.

- महानगरपालिकेची परवानगी घेणे कोणत्याही प्रकारच्या बॅनरला अनिवार्य असले पाहिजे.
- ठराविक किलोमीटरच्या अंतरात एकाच व्यक्तिचे आणि एकाच मजकुराचे किती बॅनर्स असावेत यावर बंधन घातले पाहिजे.

अर्थात शेवटी राजकारणाची एकूण रीत आणि मुद्दे बदलण्याशी अंतिमतः ही बॅनरबाजी जोडलेली आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

**नीला लिमये.**
सरचिटणीस, महाराष्ट्र महिला परिषद.

'खुले पान' हे सर्व वाचकांसाठी मुक्त व्यासपीठ आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, प्रशासन, नागरी प्रश्न, महिला प्रतिनिधी म्हणून येणारे अनुभव, न पटणाऱ्या, खटकणाऱ्या, विशेष उल्लेख केला पाहिजे, एखाद्या विषयावरील माझे मत, अपेक्षा - आकांक्षा किंवा माझे आग्रह असे जे जे मला आतून वाटते, सर्वांशी शेअर करावेसे वाटते त्यासाठीची ही आपली 'हक्काची जागा आहे. पहिल्या अंकात आमच्याकडून सुरूवात आहे. मात्र पुढच्या अंकात आपल्यापैकी एकीचे हे 'खुले पान' असेल, अशी अपेक्षा आहे. साधारण ५०० शब्दात आपण लिहून पाठवावे.

**पत्ता आहे,**
**'कारभारीण शहराची'**
**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई**
एम.एन.रॉय मानव संसाधन परिसर, प्लॉट नं. ६, एफ ब्लॉक, शासकीय वसाहती समोर, इमारत क्र. ३२६,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.दूरध्वनी क्र. : ०२२-२६५७३७९५ / ९६

राज्यशासनाने घेतलेले निर्णय, विविध योजना, महत्वाची धोरणे यांचे नागरी कारभारात अनन्यसाधारण महत्व आहे. आपल्या सारख्या शहरातील कारभारात सक्रीय होऊ पाहणाऱ्या किंबहुना सक्रीय असणाऱ्या कारभारणींना 'जी आर' या शब्दाची महती व शक्ती नक्कीच माहीत असेल. शहराच्या विकासात भरीव योगदान देण्याच्या दृष्टीने तसेच मतदारसंघातील आपले काम बळकट व वाढवण्याच्या दृष्टीने यासर्वांची माहिती असणे; पण त्याचबरोबर यातल्या संधी, कामाच्या जागा हेरता येणे हे ही तितकेच महत्वाचे आहे. अनेक महत्वपूर्ण शासन निर्णय व योजना आपल्या स्थानिक कामाचा 'अजेंडा' होवू शकतात. इतकी 'सशक्तता' यामध्ये नक्कीच आहे. या जाणीवेतून या सदरामधून काही महत्वाचे शासननिर्णय योजना आपल्यापर्यंत पोहचवण्याचा आमचा प्रयत्न राहिल.

पहिल्या अंकात आपण महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीमधील महिला व बाल कल्याण समितीने राबवायच्या योजना संदर्भातील शासन निर्णय देत आहोत. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने दि. ८ नोव्हेंबर २०१० या तारखेला शासन निर्णय क्रमांक २००५ / प्र. क्र. २५५ / ०५ / नवि - २० - शासन निर्णय प्रसिध्द केला आहे. हा शासन निर्णय पुढे दिला आहे.

राज्य शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मध्ये दुरूस्ती करून महानगरपालिका व नगरपरिषदांना महिला व बालकल्याण समिती गठित करण्याचे अनिवार्य केले आहे. दि. १७ एप्रिल १९९३ च्या शासन निर्णयाद्वारे या समितीने कोणती कामे करावीत याची यादी दिली. तसेच १९ जुलै १९९३ च्या शासन निर्णयाद्वारे ही कामे करण्यासाठी लागणाऱ्या 'निधीची तरतूद' केली गेली. महानगरपालिका व नगरपरिषदांच्या अर्थसंकल्पामध्ये या निधीची तरतूद करावयाची आहे. एकूण महसूली उत्पन्नामधून बांधील खर्च (कमिटेड एक्सपेन्डिचर) वजा करता उर्वरित रक्कमेच्या पाच टक्के निधी हा महिला व बालकल्याण समितीला मागणीनुसार उपलब्ध करून द्यावा असे आदेश या शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आले आहेत. बदलत्या काळानुसार परिस्थिती व स्थानिक गरजांचे बदलते स्वरूप पाहता १९९३ साली तयार करण्यात आलेल्या कामांच्या यादीत आवश्यक बदल होण्याची गरज लक्षात घेता दि. ८ नोव्हेंबर २०१० च्या शासन निर्णयाद्वारे 'कामाची यादी', आवश्यक ते फेरबदल करून प्रसिध्द केली आहे. एकूण १५ कामांची यादी दिलेली आहे. या कामांसाठी महिला बालकल्याण समितीचा निधी उपलब्ध होवू शकतो. ही कामांची यादी सोबत दिलेल्या शासन निर्णयामध्ये आहे. वर्षाच्या सुरूवातीला आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेची या संदर्भातील योजना कार्यक्रम तयार करणे व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाची माहिती राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाला कळवायची आहे.

या शासन निर्णयाची आपल्या शहरात, आपल्या प्रभागात नक्कीच अंमलबजावणी करता येवू शकते. अर्थसंकल्प बनत असताना मनपातील महिला लोकप्रतिनिधींनी स्थानिक गरजांनुसार महिला व बालकल्याण समितीचा येत्या वर्षाचा 'योजना-कार्यक्रम' निश्चित करावा आणि त्यासाठीची अर्थसंकल्पातील निधीची तरतूद मंजूर करून घ्यावी. एक महिला म्हणून महिलांसाठीच्या व मुलांच्या गरजांना शहराच्या विकासाच्या अन्य गरजांइतकेच विशेष प्राधान्य देता येऊ शकते.

शब्दांकन
**एफ. बी. खान**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

❐❐❐

## महानगरपालिका व नगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती यामध्ये महिला व बालकल्याण समितीने राबवण्याच्या योजना

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५ / प्र. क्र. २५५०५ / नवि - २०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ८ नोव्हेंबर, २०१०

वाचा : १) नगरविकास विभाग, शासन पत्र क्र. जीईएन - १०९३ / ३२५ / प्र. क्र. २४ / नवि - ३२, दि. १७ एप्रिल, १९९३.

२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीईएन - १०९३ / ११९८ / नवि - १४, दिनांक १४ जुलै, १९९३.

३) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५ / प्र. क्र. १५६ / ०५ / नवि - २०, दिनांक ३० डिसेंबर, २००६.

**प्रस्तावना :**

शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ मधील कलम ६२, ६३, व ६५ मध्ये सन १९९२ मध्ये दुरूस्ती करण्यात आली. या दुरूस्तीमुळे प्रत्येक ''अ'' व ''ब'' वर्ग नगरपरिषदेने महिला व बालकल्याण समितीची स्थापना करावी, असे बंधन घालण्यात आले. तसेच ''क'' वर्ग नगरपरिषदांना या समितीची स्थापना करता येईल. अशी तरतूद कलम ६५ मध्ये करण्यात आली. या समितीने करावयाची कामे क्रमांक जीईएन / ३२५ / प्र.क्र. २४ / ३२, दिनांक १७ एप्रिल, १९९३ अन्वये परिपत्रकात प्रस्तुत करण्यात आली आहेत. सदर परिपत्रकीय पत्रातील कामाची यादी सूचक असून परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही. त्यामध्ये कलमानुसार बदललेली परिस्थिती, स्थानिक गरजा लक्षात घेवून यादीमध्ये बदल करणे, वाढ करणे, वगळणे आवश्यक ठरणार आहे आणि महिला व बालके यांच्या कल्याणासाठी योजना राबविणे हे मुख्य ध्येय व धोरण लक्षात घेऊन यादीत आवश्यक फेरबदल करण्यास नगरपालिका सक्षम असतील असे दिनांक १४ जुलै १९९३ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. महिला व बालकल्याण कार्यक्रमामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रमांमध्ये बदल / सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार संकीर्ण २००५ / प्र. क्र. १५६ / ०५ / नाव - २०; दिनांक ३० डिसेंबर २००६ या शासन निर्णयामध्ये आवश्यक त्या योजना / कार्यक्रमांमध्ये बदल / सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यांतील महानगरपालिका, नगरपरिषद / नगरपंचायती यामध्ये महिलांच्या विविध योजना राबविण्याकरिता महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने राबवायचे कार्यक्रम सदंर्भाधीन पत्र व शासन निर्णयान्वये सर्व महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायती यांना कळविण्यात आले होते. तथापि, बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाह्य झाल्यामुळे त्यामध्ये बदल / सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती मध्ये अशा योजनांसाठी अत्यल्प तरतुद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रितीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायती क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी महिला व बालकल्याण यासाठी राखीव ५% तरतूदीतून खालील योजना राबविण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

**शाननिर्णय :**

महिला व बालकल्याण यासाठी राखीव असलेल्या ५% तरतुदीतून खालील बाबींवर खर्च करण्यात यावा :

१. ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारती भाड्याने आहेत किंवा अयोग्य सार्वजनिक इमारतीमध्ये भरत आहे. त्यासाठी अंगणवाडी केंद्राची इमारत बांधून यामध्ये आय.सी.डी.एस. योजनेसाठी रू. १/- दरमहा नाममात्र भाड्यावर उपलब्ध करून देणे.

२. अंगणवाडी केंद्रातील मुलांकरिता आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करणे.

३. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निर्माण करणे व शौचालय बांधकाम करणे.

४. मुलांकरीता पोषण आहार पुरविणे.

५. ०-३ वर्षाच्या मुलांकरिता Creche किंवा Day Care Centre बांधणे व क्रियान्वित करणे तसेच पाळणाघर चालविणाऱ्या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.

६. गरोदर महिलांसाठी तसेच शालेय विद्यार्थी व अंगणवाडी विद्यार्थी यांची वैद्यकीय तपासणी व औषधोपचार करणे.

७. मुलींकरीता शिष्यवृती योजना राबविणे.

८. महिलांसाठी प्रसुतीगृह बांधणे अथवा श्रेणीवाढ करणे अथवा विस्तारीकरण करणे.

९. मुलींना / महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

१०. काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह बांधणे.

११. शिकणाऱ्या मुलींसाठी वसतिगृह बांधणे.

१२. पोलिओग्रस्त किंवा अपंग मुलांना Prosthetic aidsपुरविणे.

१३. महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे, helpline चालविणे, विधी सल्ला केंद्र चालविणे इ.

१४. BPL खालील मुलींची शाळा गळतीचे प्रमाणे थांबविण्याबाबत प्रोत्साहनपर दैनिक उपस्थिती भत्ता देणे.

१५. मुलींच्या सार्वजनिक शाळेत विविध क्रिडा सुविधा निर्माण करणे.

शासनाने मान्य केलेल्या वरील योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करून राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकाच्या आयुक्तांना रहातील. तथापि नगरपरिषद / नगरपंचायती यांचे मुख्याधिकाऱ्यांना वरील शासनमान्य योजनांपैकी फक्त रू. १० लाख प्रति योजना या आर्थिक मर्यादेपर्यंत योजनेस मान्यता देणे व योजना राबविण्याचे अधिकार रहातील. रू. १० लाखाच्या वर एखाद्या योजनेची आर्थिक मर्यादा येत असल्यास त्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची मान्यता घेण्यात यावी. मान्य योजनेपैकी कोणतीही रू. १० लाखाच्या आतील योजना राबविण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती यांना रहातील. मात्र वरील मान्य केलेल्या योजनांव्यतिरिक्त एखादी नवीन योजना घ्यावयाची असेल किंवा विद्यमान योजनेच्या नियम व अटींमध्ये बदल करावयाचे असल्यास त्यांनी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. योजनेच्या अंमलबजावणी व नियंत्रणासाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे हे नियंत्रण अधिकारी असतील व जिल्हास्तरावर जिल्हा व महिला बालविकास अधिकारी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायती यांनी प्रत्येक वर्षाच्या सुरवातीपासूनच योजना राबविण्याच्या कार्यक्रम तयार करण्याची दक्षता घ्यावी व या योजनांवर करण्यांत येणाऱ्या खर्चांची माहिती महिला व बाल विकास विभागास सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(र.शि.घाटगे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई - २५

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन (सर्व)

जिल्हाधिकारी (सर्व)

आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

निवड नस्ती, नवि - २०

❒❒❒

# अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

१९२६ साली स्थापित अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई ही एक स्वायत्त अग्रगण्य प्रशिक्षण व संशोधन संस्था आहे. या संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभाग यांनी २५ ऑक्टोबर १९७१ साली 'शैक्षणिक संस्था' म्हणून मान्यता दिलेली आहे. संस्थेचे मुख्य केंद्र मुंबई इथे असून, गेले अनेक दशके भारतातील विविध शहरात संस्था महानगरपालिका / नगरपरिषदा यांच्या प्रशिक्षणासाठी सक्रीय कार्यरत आहे. तसेच भारतातील अनेक प्रमुख शहरात संस्थेची विभागीय केंद्रे आहेत.

३० जानेवारी, १९६८ साली भारत सरकारच्या तत्कालिन आरोग्य, कुटुंब नियोजन व नगरविकास (सध्याचे नगर विकास मंत्रालय) मंत्रालयाने विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्राची (RCUES) संस्थेत स्थापना केली. प्रस्तुत केंद्र हे भारतातील पश्चिम विभागातील महाराष्ट्र, गोवा, गुजरात व राजस्थान ही राज्ये व दीव, दमण, दादरा आणि नगरहवेली हे केंद्रशासित प्रदेश आणि आसाम व त्रिपुरा यामध्ये शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या संपूर्ण आर्थिक साहाय्याने कार्यरत आहे. प्रस्तुत विभागीय अभ्यास केंद्र प्रामुख्याने महानगरपालिका / नगरपरिषदा अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्यासाठी विशेष प्रशिक्षण सत्रे, शहरांच्या समस्या आणि शहर व्यवस्थापन विषयक संशोधन आणि तांत्रिक सल्ला देण्याचे काम करते. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रस्तुत विभागीय केंद्राच्या विशेष सल्लागार मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

१९९० सालापासून प्रस्तुत विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्र (RCUES) हे नागरी गरिबी उपशमन विषयक प्रशिक्षणाबाबत भारत सरकार द्वारा राष्ट्रीय प्रशिक्षण संस्था (NTI)म्हणून मान्यता प्राप्त आहे. ४ नोव्हेंबर, १९९७ सालापासून शहरी कार्य व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांनी सुवर्ण जयंती शहरी राजगार योजना (SJSRY) अंतर्गत महानगरपालिका / नगरपरिषदा यांना नागरी गरिबी उपशमन विषयक प्रशिक्षण देण्यासाठी संस्थेच्या विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्रास मान्यता दिली आहे. शहरी गरिबी विषयक राष्ट्रीय धोरण प्रकल्पा अंतर्गत शहरी गरिबी निर्मूलनासाठी भारत सरकार आणि यूएनडीपी यांच्या पुढाकाराने मुंबई येथील अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेत विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्र यामध्ये शहरी गरिबी विषयक राष्ट्रीय संशोधन केंद्राची २००५ मध्ये स्थापना करण्यात आली आहे. भारत सरकारचे गृहनिर्माण व शहरी गरीबी उपशमन मंत्रालय आणि युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) यांचे सहाय्य व पाठबळ या संशोधन केंद्रास लाभलेले आहे.

१७ जून २००९ पासून गृह निर्माण आणि नागरी गरीबी उपशमन मंत्रालय, भारत सरकार द्वारा सुवर्ण जयंती शहरी रोजगार योनेच्या यशस्वी अंमलबाावणीकरीता प्रस्तुत विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्राला 'नोडल साधन केंद्र' म्हणून मान्यता देण्यात आली आहे. हे नोडल संसाधन केंद्र म्हणून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने भारताच्या पश्चिम विभागातील महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, गोवा ही राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश दीव, दमण, दादरा आणि नगरहवेली मध्ये कार्यरत आहे. गृह निर्माण आणि शहरी गरिबी उपशमन मंत्रालय, भारत सरकार यांच्या २२ जुलै २०१० मध्ये महाराष्ट्र, गोवा. गजरात, राजस्थान व दमण, दीव, दादरा नगर हवेली कैंद्रशासित प्रदेशांसाठी नोडल संशोधन केंद्र म्हणून परत मान्यता दिली.

२००७ साली, गृहनिर्माण आणि नागरी गरिबी उपशमन मंत्रालय, भारत सरकार द्वारा, नागरी गरिबी व उपाविविकेची साधने संबंधी राज्य व शहर स्तरीय कक्षाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने शासन निर्णय क्र. युपीएलसी-२००८/५७८/प्र.क्र. ६१/नवि-१६ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक १७ जून २००७ द्वारा संस्थेत नागरी गरिबी व उपजिविकेची साधने संबंधी राज्य व शहर (मुंबई / पुणे) स्तरीय कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. नागरी गरिबांना उत्तम प्रतीच्या मुलभूत सेवा मिळाव्यात व उपजिविकेच्या संधी उपलब्ध करण्याबाबतीत स्थानिक प्रशासनाकडून योग्य ती मदत मिळावी ह्या उद्देशाने प्रस्तुत कक्षाची राज्य शासनाद्वारे स्थापना करण्यात आली आहे. शहरी गरिबांना उपजिविकेच्या संधीबाबत योग्य ती मदत / मार्गदर्शन मुलभूत सुविधांचे प्रयोजन व वितरण हे प्रस्तुत कक्षामध्ये प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन हे प्रस्तुत राज्यस्तरीय कक्षाचे अध्यक्ष असून संचालिका, विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्र, (RCUES) अखिल भारतीय स्थानिक स्वराय संस्था, मुंबई ह्या प्रस्तुत कक्षाच्या सदस्य सचिव आहेत.

भारतातील सर्व शहरातील मा. महापौर, मा. उपमहापौर व लोक प्रतिनिधी यांना नागरी गरीबी विषयक प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एक व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या गृह निर्माण आणि नागरी गरिबी उपशमन मंत्रालयाने 'महापौरांचा फोरम' संस्थेत स्थापन केला आहे. संचालिका, विभागीय नागरी व पर्यावरण अभ्यास केंद्र या प्रस्तुत 'फोरमच्या' सदस्य सचिव आहेत.

२० सप्टेंबर, २०११ रोजी पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कचरा व्यवस्थापन संशोधन केंद्राची स्थापना केली आहे. या केंद्राद्वारे घन कचरा व्यवस्थापन या विषयक प्रकल्प सल्ला व तांत्रिक मार्गदर्शन महानगरपालिका व नगरपरिषदा यांना केले जाते.

२००९ सालपासून अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'आधार केंद्र' विलेपार्ले (पू) व अंधेरी (प) याचे संपूर्ण व्यवस्थापन यशस्वीरित्या बघत आहे. प्रस्तुत आधार केंद्राद्वारे मुंबईतील गरीब महिलांना, बचत गटांना स्वयंरोगार संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने 'प्रदर्शन व विक्री केंद्र' उपलब्ध करुन दिले आहे, 'उपजिविका वृद्धी कार्यक्रम' अंतर्गत महानगरपालिकेकडून पाठविण्यात आलेल्या गरीब मुले / मुली यांच्यासाठी विविध व्यवसाया अंतर्गत 'कौशल्य वृद्धी कार्यक्रम' आयोजित करुन प्रशिक्षित मुले / मुली यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतात.

# संस्था परिचय

## टाटा सामाजिक विज्ञान संस्था, स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज

मुंबईतील वर्ष १९३६ मध्ये स्थापन झालेली टाटा सामाजिक विज्ञान संस्था ही देशातील अग्रगण्य शैक्षणिक आणि संशोधन संस्था आहे. भारतामध्ये समाज-कार्याचे शास्त्रशुध्द शिक्षण ही संकल्पना रूजवण्याच्या आणि तिचा अनेक अंगांनी विस्तार करण्याच्या प्रयत्नांमध्ये या संस्थेचा महत्वाचा वाटा आहे. भारताबाहेरील विविध देशांमध्ये देखील संस्थेने तेथील शैक्षणिक संस्थांच्या सहयोगाने त्या-त्या परिस्थितीला अनुरूप असे शैक्षणिक प्रकल्प उभारले आहेत.

समाजकार्याचे शिक्षण देणारी नामांकित संस्था याबरोबरच महाराष्ट्रातील, तसेच देशातील महत्वाच्या विकास प्रश्नांवरील संशोधन व अभ्यासाद्वारे धोरण प्रक्रियेत योगदान देणारी नि:ष्पक्ष संशोधन संस्था असा देखील संस्थेचा लौकिक आहे.

समाजकार्याचे शिक्षण, विकास-प्रश्नांवर अभ्यास - संशोधन याखेरीज संस्थेने शेती आणि उपजीविका, स्त्री-प्रश्न, कारागृहाशी निगडित प्रश्न यासारख्या शहरी आणि ग्रामीण प्रश्नांवर कृती-प्रकल्प उभे केले आहेत.

वर्ष २००८ पासून नागरी क्षेत्रात सुरू असलेल्या धोरणात्मक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या संस्थेतील 'स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज' ने नागरी प्रश्नांबाबतही अभ्यास सुरू केलेला आहे. लहान आणि मध्यम शहरांचे विकास प्रश्न आणि जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण अभियानामुळे नागरी क्षेत्रात निर्माण होणारी आव्हाने आणि संधी हा या अभ्यासाचा मुख्य विषय आहे. याचाच भाग म्हणून काही ठराविक क्षेत्रांचा उदा. शहरातील नियोजन, पाणी प्रश्न, गृहनिर्माणाचे प्रश्न तसेच नागरी कारभारातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व, संधी आणि लोक सहभाग यांच्या अनेकविध पैलूंचाही अभ्यास सुरू आहे. हे द्वैमासिक याच कामाचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

## महाराष्ट्र महिला परिषद

महाराष्ट्र महिला परिषद ही १५ वर्ष शहरी आणि निम शहरी भागात काम करणारी संघटना आहे. १९९५ साली महाराष्ट्र शासनाने "महिला धोरण" जाहीर केले. त्यापूर्वी केंद्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले. या धोरणाचे महत्व समजून महिला धोरणाची अंमलबजावणी, मालमत्तेत महिलांना समान वाटा, विधानसभा व लोकसभेत महिलांना ३३टक्के आरक्षण हे मुद्दे घेऊन महिलांना संघटित करण्याच्या हेतूने संघटनेची स्थापना झाली.

महिला संघटनेतील महिलांनी राजकारणात सक्रीय व्हावे या दृष्टीने कार्यरत आहे. पक्ष राजकारण, वस्ती पातळीवरील प्रश्न सोडविण्यासाठी दबावगटाचे राजकारण ते निवडणुकीला उभे राहणे या करिता महिलांना सक्षम केले जाते. महिलांनी राजकारणात वेगळा ठसा उमटावा याकरिता त्यांचे प्रशिक्षण केले जाते. मात्र संघटनेचा व्यवहार पक्षनिरपेक्ष पध्दतीनेच केला जातो. या अनेक उपक्रम चालवले आहेत. यामध्ये शहरी भागातील मिश्र बचतगटांची बांधणी व त्यांना कर्ज पुरवठा करण्याकरिता "प्रेरणा नाविन्यपूर्ण महिला सहकारी संस्था, कौटुंबिक समस्या निवारण केंद्रे, रेशन, शाळा, पाणी, स्वच्छता अशा स्थानिक प्रश्नाबाबत पाठपुरावा, दुर्बलघटकांसाठी असलेल्या शासकीय योजना त्यांच्या पर्यंत पोहोचविणे, घरेलू कामगारांची संघटना बांधून त्यांचे व्यावसायिक प्रश्न तसेच वस्ती पातळीवर संघटन उभे करणे, कलापथकाच्या माध्यमातून जनजागृती, सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षणाद्वारे सामाजिक, राजकीय क्षमता वाढविणे व इतर सामाजिक, राजकीय आंदोलनाबाबत कार्यकर्त्यांची सातत्याने जाण वाढविणे. त्याचबरोबर महानगरपालिकेत निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या कामगिरीचा, त्यांना येणाऱ्या अडचणींचा गेले २ वर्ष अभ्यास सुरू आहे.